

धुनीतील भडकलेल्या आगीला बाबांनी हुकुमाने शांत केले.

# अनुक्रमणिका - मार्च १९७७


| | | | |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | श्री एकनाथांचे पुण्यस्मरण |
| २ | श्री मुक्तानंद परमहंस | — | श्री. सदानंद चेंदवणकर |
| ३ | श्रीसाईनाथमहाराज व गुरुदेव नित्यानंदजी | — | |
| ४ | युगावतारी श्रीसाईबाबा | — | श्री. चंद्रकांत सामंत |
| ५ | बाबांच्या उदीने पाय बरा झाला | — | सौ. विमलादेवी |
| ६ | जाण भाव माझ्या नजरेतला | — | श्री. जे. व्ही. घाटगे |
| ७ | वाऱ्यावरचे विचार | — | श्री. द. शं टिपणीस |
| ८ | श्री साईबाबा मंदिर नागपूर निर्माण प्रकल्प | — | |
| ९ | तिसरे लेखक-कवी स्नेहसंमेलन | — | |
| १० | दोन प्रश्न : विचार मंथन | — | श्री. सूर्यकांत गर्जे |
| ११ | शिरडीवृत्त | — | |
| १२ | श्रीसाईबाबांच्या पादुकांचे मुंबईकरांना दर्शन | — | |
| १३ | लेखक कवी स्नेहसंमेलनातील क्षणचित्रे | — | श्री. द. शं. टिपणीस |
| १४ | परीक्षा आणि श्री साईबाबा | — | श्री. अनिल रसाळ |
| १५ | वाचकांचा पत्रव्यवहार | — | |
| १६ | काव्याक्षदा | — | सौ. अंजली कोटस्थाने |
| १७ | साईप्रेमे ओलावती लोचन | — | उज्ज्वल कुलकर्णी |
| १८ | श्री साई महिमा | — | श्री. हसमुख ओंकार पाटील |
| १९ | मागणे | — | श्री. दे. शि. दुधलकर |
| २० | सुमंगल होते शिर्डीस्थानी | — | श्री. प्र. द. पुराणिक |
| २१ | साई दयानिधान | — | श्री. राधाकृष्ण गुप्ता 'चेतन' |
| २२ | श्री साई प्रभू आधार | — | श्री. अरविंद करमरकर |
| २३ | श्रीसाई तुझ्या मंदिरात | — | प्रा. गुंडेराव परवारी |
| २४ | साईनाथा त्रितापा हरता | — | श्री. जयवंत ना. आंबेरकर |
| २५ | साई मनोहर माझे दैवत | — | श्री. मधुकर देशपांडे |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री सा ई वा क्सु धा

काय या महात्म्याची लीनता ।
ऐकतां वाटेल आश्चर्य चित्ता ।
दिसून येईल भक्तप्रेमळता ।
अवतार सार्थकता तयांची ॥ ९५ ॥

अतुल दीनवत्सलता पोटीं ।
सानपणाची आवड मोठी ।
प्रत्यंतरास कोट्यनुकोटी ।
येतील गोष्टी सांगावया ॥ ९६ ॥

कधीं ना उपास वा तापास ।
हठयोगाचाही सायास ।
कधीं न रसासक्तीची आस ।
अल्पाहारास सेवीतसे ॥ ९७ ॥

जाऊनियां नियमित घरीं ।
मागे ओली कोरडी भाकरी ।
हीच भिक्षा नित्य मधुकरी ।
कोड न करी जिव्हेचें ॥ ९८ ॥

पुरवी न रसनेचे लाड
मिष्टान्नाची धरी न होड ।
प्राप्त प्राप्त घडगोड ।
त्यांतचि गोड मानी तो ॥ ९९ ॥

—श्रीसाईसच्चरित्—अध्याय २३ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५५ वे ] मार्च ७७ [ अंक १२

: संपादक :
श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६—०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४—बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ १२ ६१

## संपादकीय —

स. न. वि. वि.

# श्रीसंत एकनाथांचे संस्मरण

फाल्गुन वद्य षष्ठी हा दिवस नाथसंप्रदायातली भक्तमंडळी परमपवित्र दिवस म्हणून पाळतात. श्रीसाईबाबा नाथ संप्रदायातले होते आणि म्हणून श्रीसाईभक्त सुद्धा हा दिवस पवित्र समजतात. हा दिवस नाथषष्ठी म्हणून ओळखला जातो. श्री संत एकनाथांचे वास्तव्य असलेल्या पैठण क्षेत्री तर फार मोठी यात्रा भरते आणि नाथांच्या जयघोषाने सारा परिसर अक्षरशः दुमदुमून जातो. नाथषष्ठी ही तिथी श्रीएकनाथ महाराजांच्या पुण्यस्मरणाची आहे.

जातिभेदाची प्रतिष्ठा झुगारून देऊन प्रत्येक मनुष्यमात्राच्या व पशु पक्ष्यादिकांच्या ठिकाणी भगवत् स्वरुप आत्मा एकच आहे, हा चिरंतन सिद्धांत एकनाथ महाराजांनी समाजाच्या गळी उतरविला. संस्कृत वाङ्मय फक्त ब्राम्हणांनीच वाचावे, हेहि बंधन झुगारून देऊन समाजाच्या सर्वांगीण थरांना भक्तिवाङ्मयाची दारे भागवतादि ग्रंथ लिहून खुली करून दिली, व अमुक एका जातीत जन्माला आला म्हणून त्याला देवाचे दर्शन घेता येत नाही या सामाजिक रूढीला नाथांनीच जोरदार धक्का दिला.

मानवधर्माची महान शिकवण देणाऱ्या संतमालिकेत एकनाथांचे नाव व स्थान पहिल्या क्रमांकाचेच ठरवावे लागेल. अस्पृश्यतेचे उच्चाटन, समतावाद व भूतदयेचा संदेश स्वतःच्या कृतीने देणाऱ्या नाथमहाराजांची थोरवी संतमालिकेत फार वरच्या श्रेणीची आहे.

श्रीएकनाथ महाराजांचा जन्म इ. स. १५३२ मधे पैठण येथे झाला. ते वयाच्या बाराव्या वर्षी स्वगृह सोडून दौलताबाद येथे श्रीजनार्दन स्वामींच्याकडे गेले. तिथे बारा वर्षे राहून त्यांनी गुरुकृपा संपादन केली. तीर्थयात्रादी विधि संपवून स्वगृही परत आल्यावर गुर्वाशेवरून त्यांनी विवाह केला. विवाह झाल्यावर नाथांनी प्रपंच करीत कवित्व केले व ग्रंथ लिहिले. त्यांच्या सुशील पत्नी गिरिजाबाई यांनी नाथांच्या पारमार्थीक संसारात चांगलेच सहकार्य केले.

श्रीसंत एकनाथांचे सारेच चरित्र त्यांच्या शिकवणूकीप्रमाणे कष्टमय व त्यागमय आचरणाने स्फूर्तिप्रद आहे. गोदावरीच्या वाळवंटात चुकलेले अस्पृश्याचे मूल कडेवर घेऊन घरी नेऊन सोडणे, ब्राम्हणास जेऊ घालण्यापूर्वी भुकेलेल्या अंत्यजास

श्राद्धीय अन्न वाढून तृप्त करणे, महारांच्या घरी भोजनास जाणे, काशीहून आणलेली गंगा "हाच माझा रामेश्वर" म्हणून गाढवाच्या तोंडात ते गंगाजळ ओतणे इ. कृतिशीलत्वाची उदाहरणे नाथांशिवाय इतर संतचरित्रात क्वचितच आढळतात, एका पैशाच्या हिशेबासाठी तर ते रात्रभर जागले व चूक शोधून काढली.

केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर अखिल भारताला वंदनीय ठरलेल्या व मानव धर्माची महान शिकवण देणाऱ्या ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम व रामदास या संत पंचकात एकनाथांचे वाङ्मय सर्वात अधिक आहे. त्यांच्या गाथ्यात भारूड नावाचे स्वतंत्र प्रकरण आहे. वाङ्मयीन कवित्वाचा हा एक नवाच प्रकार नाथांनी सुरु केला. नाथांच्या भारूडातला कार्यक्रम आपण शिर्डी क्षेत्री चारी उत्सवप्रसंगी रात्री पालखीच्या वेळी करीत असतो; व तो पहाण्यासाठी भक्तमंडळी दाटीवाटीने गर्दी करून असतात.

समाजाचे निरीक्षण करण्याची नाथांची दृष्टी अतुलनीय अशीच आहे. नाथमहाराज हयात असताना द्वारकेचा राणा श्रीकृष्ण श्रीखंड्या हे नाव धारण करून नाथांच्या घरी पाणी वाहण्याचे काम करीत असे.

श्री एकनाथजी-सदनी माधवजी सर्व कामही करितो ।<br>
स्वकरें चंदन घासी गंगेचे पाणी कावडी भरितो ॥

आणि हा अनुभव भक्तांनो, आजही प्रतिवर्षी पैठण क्षेत्री पाहावयास सापडतो. पैठणला नाथांच्या आतल्या मंदिरात त्यांचे पूजेचे देव ज्या देव्हाऱ्यात आहेत, त्या मंदिरात दक्षिण दरवाजा लगत एक रांजण आहे. तुकाराम बीजेपूर्वी तो धुवून स्वच्छ केला जातो. बीजेच्या दिवशी बारा वाजता त्याची विधीयुक्त पूजा केली जाते; व त्यानंतर शुचिर्भूतपणे गोदावरीचे गंगेचे पाणी आबालवृद्धांकडून त्यात टाकले जाते. या गर्दीतच एके दिवशी केव्हातरी कोणत्याही रूपाने साक्षात् देव आपली घागर ओततात. शेकडो लोकांच्या प्रयत्नाने न भरणारा हा रांजण मग देवाची घागर पडल्याबरोबर भरून उफाळला जातो, व मंडपातील फरशीवरून पाणी मंदिरात वाहू लागते. हा चमत्कार व परमेश्वरी साक्षात्कार सध्याही पैठण क्षेत्री तुकाराम बीजेपासून रंगपंचमीपर्यंतच्या काळात घडून येतो.

गृहस्थाश्रमाचे उत्तम पालन करीत करीत आपल्या ग्रंथसंभारातून व कीर्तनप्रवचनातून लोकोपदेश, लोकजागृति व लोकोद्धाराचे महनीय कार्य हयातभर एकनाथांनी केले.

फाल्गुन वद्य षष्ठी यादिवशी आपण थोरल्या घरी जाणार असे नाथमहाराज अगोदर पासून सांगत असत. ठरल्याप्रमाणे षष्ठीचा दिवस उजाडला तेव्हा पैठणक्षेत्री

नाथांच्या वाड्यासभोवती गर्दी मावेना. महार आले, मांग आले, ब्राम्हण आले, शिष्य आले. सर्वांच्या दिंडीसह नाथमहाराज गोदातीरी निघाले. एका ठिकाणी नाथांनी निरुपण आरंभिले तेच अमृताचे अखेरचे निरुपण ठरले. भूतदयेचा आणि समतेचा महान संदेश त्यांनी दिला. भक्तिचा रंग चढविला. भावाची फुले चहू दिशांना फुलविली, नाथांनी सारा श्रोतृगण धुंद करुन टाकला आणि मग नाथ गंगेला निघाले. गुडघाभर, कंबरभर, छातीभर पाण्यात नाथ गेले व दिसेनासे झाले. नाथांनी जलसमाधी घेतली. मग तेथून फुले वरती आली. तो दिवस २५ फेब्रुवारी १६०० हा होता. आज पैठणला यात्र जागी विशाल मंदिरात नाथांची समाधी आहे. तिथे मंदिर बांधण्यात आले आहे. त्याला बाहेरचे मंदिर असे म्हणतात. नाथषष्ठीस तिथेही मोठा उत्सव होतो. त्यावेळी तिथे हजारो भक्तगण जमतात, नाथांचे गुणगान करतात गातात आणि ऐकतात. यंदाच्या वर्षी हा नाथषष्ठीचा सोहळा ११ मार्च रोजी येतो. चला आपणही नाथांचे पुण्यस्मरण करु या व अस्पृश्योद्धाराचा, भूतदयेचा व समतेचा त्यांचा संदेश आचरणात आणू या.

बोला निवृती ज्ञानदेव सोपानदेव मुक्ताबाई ।
एकनाथ नामदेव तुकाराम ॥


### वर्षातून पाच खास अंक प्रकाशित करणारे

# मराठीतील एकमेव मासिक श्रीसाईलीला

१) रामनवमी विशेषांक
२) श्री दत्तगुरु विशेषांक
३) श्री पुण्यतिथी विशेषांक
४) दिवाळी भक्त स्वानुभव विशेषांक
५) श्रीसाई काव्यबहार विशेषांक

वार्षिक वर्गणी अवघी सहा रुपये ट. ह. सह

# श्रीसाईभक्ताना श्रद्धांजली




परळ येथील एक वयोवृद्ध साईभक्त श्री. विश्वनाथ सोनु साळसकर यांचे अकस्मात् हृदयविकाराचा जबरदस्त झटका येऊन चालत्या बसमध्येच दादर येथे निधन झाले. श्रीबाबांवरची त्यांची निस्सीम भक्ती म्हणूनच की काय त्यांस गुरुवारच लाभला. गोल्ड मोहोर गिरणीतून सेवानिवृत्त होण्यास त्यांना अवघा एकच आठवडा काय तो बाकी होता. दरवर्षी ते न चुकता शिरडीस भेट देत. त्यांनी भेटी दाखल दिलेला पाळणा उत्सव प्रसंगी आजही शिर्डीस वापरला जातो. त्यांच्या पश्चात पत्नी, पुत्र व तीन कन्यका इ. परिवार आहे. परमेश्वर मृतात्म्यास सद्गति देवो.

---

# डॉ. प्रभुदास मेहता निवर्तले

मुंबईतील बाबुलनाथ मंदिरासमोर गेली अनेक वर्षे राहात असलेले साईभक्त डॉ. प्रभुदास मेहता २१ जानेवारी ७७ रोजी निधन पावले. ब्रम्हांड रश्मींच्या (कॉसमिक रेज) सहाय्याने ते अति दूर असलेल्या रोग्यावरही परिणामकारक इलाज करीत असत. त्यांचे इलाज करण्याचे कार्य आम्ही स्वतः जाऊन पाहिलेले आहे. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो.

# भगवान श्रीमुक्तानंद परमहंस



श्री गणेशपुरी योगभूमि पवित्र । तिथे नांदतो योगीराजा समर्थ ॥
तया आळवितां परमानंद प्राप्ती । नमस्कार माझा श्रीमुक्तानंदासी ॥ १ ॥

गाठी भेटी – २६

# सुस्वागतम् बाबा सुस्वागतम्

## गुरु भक्तिपरायण

# स्वामी मुक्तानंद परमहंस

—सदानंद चेंदवणकर
" राधामाधव " १२०।४०५५ टिळक नगर
चेंबुर मुंबई ४०० ०८९

● वज्रेश्वरी जवळील गणेशपुरी आश्रमाचे सर्वस्व श्रीस्वामी मुक्तानंदजी आणि त्यांच्या काही निवडक शिष्यगणांचे भगवान श्रीसाईबाबांच्या शिर्डी क्षेत्री आगमन होत आहे. या प्रसंगी आम्ही त्यांचे सुस्वागत करतो. श्रीसाईबाबा संस्थानच्या श्रीसाईनाथ इस्पितळाच्या दुसऱ्या मजल्याचे, श्रीसाईनाथ विद्यालयाच्या नव्यानेच बांधलेल्या एका दुसऱ्या टुमदार इमारतीचे, लेंडी बागेतील नव्यानेच स्थापन केलेल्या सुंदर श्रीदत्त मूर्तीच्या मंदिराच्या कळसाचे श्रीस्वामीजींच्या शुभहस्ते उद्घाटन होत आहे. तसेच संस्थानतर्फे नव्याने बांधण्यात येणाऱ्या नूतन भोजनगृहाचे भूमिपूजन श्रीमुक्तानंद बाबांच्याच करकमलाने होत आहे, हा एक अपूर्व योगायोग आहे.

श्रीमुक्तानंदजी गणेशपुरीतील एक प्रभावी शक्ती आहे. शिर्डी संस्थानचे व त्यांचे अगदी निकटचे संबंध आहेत; अगदी जिव्हाळ्याचे, अत्यंत आपुलकीचे आणि म्हणूनच वरील सत्-कार्य प्रसंगी मुक्तानंदबाबा उपस्थित राहात आहेत.

श्रीमुक्तानंद बाबा हे मूळचे कर्नाटकातले. दक्षिण कर्नाटकात नेत्रावती नदीच्या तीरावर धर्मस्थळ नावाचे एक निसर्गसौंदर्यसंपन्न गाव आहे. या गावात असलेले श्रीमंजुनाथ नावाचे शिवमंदिर एक जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाते. या गावात एक सधन कुटुंब धर्मपरायण व भाविक होते. सर्व प्रकारची सुखे या कुटुंबाच्या पायाशी लोळण घेत होती. पण असे असूनही हे कुटुंब दुःखी होते. कारण या कुटुंबात मुलगा नव्हता. एके दिवशी या कुटुंबातील मातेने श्रीमंजुनाथ महादेवाला साकडे घातले. "हे मंजुनाथा महादेवा, मला पुत्र नाही, तुझ्या कृपेने मला पुत्राचा लाभ व्हावा. मी रौप्यतुला करेन" नवसाला पावणाऱ्या श्रीमंजुनाथाने ही हाक ऐकली व लौकरच त्य

स्त्रीच्या पोटी साक्षात भगवान मंजुनाथ महादेवाने जन्म घेतला. ती माऊली तोंड धूत बसलेली असताना एकाएकी तिने बाळाला जन्म दिला. या बाळाचे नाव कृष्णा असे ठेवण्यात आले. त्या माऊलीने बाळाची रौप्यतुला करून बोलल्याप्रमाणे श्रीमंजुनाथाचा नवस फेडून टाकला. हाच कृष्णा बाळ म्हणजे आजचे स्वामी श्रीमुक्तानंद महाराज होत. १६ मे १९०८ ची वैशाख पौर्णिमा हा त्यांचा जन्मदिन होय.

लहानपणी कृष्णा अतिशय देखणे होते. शरीराने ते सुदृढ, चपळ होते. त्यांचे नेत्र पाणीदार होते. शाळेतल्या अभ्यासातही ते हुषार होते. ते आपल्या सवंगड्यांशी मिळून मिसळून वागत व खेळत, मुला-मुलांमध्ये जर का मारामारी झाली तर कृष्णा न्याय देत असे. लहानपणापासूनच त्यांची अंतवृत्ती सर्वसामान्याहून भिन्न होती. निरनिराळ्या स्थळांची वर्णने वाचून-ऐकून कृष्णाचे मन अस्वस्थ होत असे. ही स्थळे आपल्याला प्रत्यक्ष केव्हा पहायला मिळतात असे त्या किशोर कृष्णांना वाटे.

एकदा थोर योगी भगवान नित्यानंद स्वामी दक्षिण कर्नाटकात गेले होते. कृष्णाच्या गावापासून ते थोड्याच अंतरावर उतरले होते. त्यांच्या शिष्यवर्गात सर्व धर्मातील लोकांचा भरणा असे. त्या शिष्यांपैकी एक मुसलमान होता. तो एका गिरणीचा मालक होता. त्याने मंगलोर शहरातील काद्री टेकडीवर भंडारा केला, त्याला नित्यानंदजी हजर होते. तिथे त्यांच्या दर्शनासाठी नुसती रीघ लागली होती. आपल्या आई वडीलांबरोबर पंधरा वर्षांचे कृष्णा पण तिथे दर्शनास आले होते; आणि काय आश्चर्य पहा! अफाट गर्दी तिथे असून सुद्धा भगवान नित्यानंदांचे लक्ष कृष्णाने वेधून घेतले. त्यांनी त्यांस जवळ बोलावून घट्ट आलिंगन दिले. याच क्षणी कृष्णा ध्यानावस्थेत जाऊन त्यांस गाढ समाधी लागली. या विलक्षण अनुभवाने त्यांस अत्यानंद झाला व त्याच अवस्थेत ते घरी परतले खरे, पण सारे लक्ष नित्यानंदांकडे लागले.

दोन चार दिवसातच नित्यानंद स्वामी तिथून निघून गेले पण कृष्णाची समाधी काही केल्या उतरेना. आपले गुरु आपल्याला पुन्हा केव्हा भेटतील हीच एक तळमळ कृष्णास लागून राहिली होती. त्यांना अभ्यास जेवणखाण, आई-वडील, घर-दार काही सुचेना. त्यांची मनस्थिती बदलली. सद्गुरु नित्यानंद स्वामींना भेटायचे, परमेश्वराचा साक्षात्कार करून घ्यायचा या विचाराने ते अक्षरशः तळमळू लागले व एके दिवशी शाळेत जाण्याच्या निमित्ताने ते जे घराबाहेर पडले ते कायमचेच. निघताना त्यांनी आपल्या घरातल्या देवांना, आई-वडीलांना नमस्कार केला. पण शाळेत जाण्या ऐवजी त्यांची पाऊले गावाबाहेरील घाटाकडे वळली. पुस्तके, दसर त्यांनी फेकून दिले. त्यावेळी त्यांच्या जवळ एक पैसाही नव्हता. चालत चालत ते हुबळीला आले तिथे सिद्धारुढ स्वामींच्या मठात त्यांनी प्रवेश केला. त्यांच्या आध्यात्मिक जीवनाला आरंभ तिथेच

झाला. श्रीसिद्धारूढांनीच कृष्णास संन्यास दीक्षा दिली व त्यांचे नाव 'मुक्तानंद' असे ठेवले. योगाभ्यास द्वारा भराऱ्या मारणारे हे संत पुरुष म्हणून मुक्तानंद. बाबा मुक्तानंदांनी हुबळीच्या मठात वेदांतशास्त्र शिकून घेतले.

हुबळीहून बाबा धारवाड जिल्ह्यातील उरैणी-हले या गावी आले, व तेथल्या सिद्धारूढ पुरुषोत्तम स्वामींच्या मठात त्यांनी वास्तव्य केले. तिथे सर्व पुराणांचा त्यांनी अभ्यास केला. खूप ज्ञान संपादन केले. त्या मठाच्या जवळच एक टेकडी होती. त्या टेकडीवर शंकराचे देऊळ बांधण्यासाठी स्वतःच्या डोक्यावरुन दगड उचलून नेले. त्याच ठिकाणी मुप्पीनार्य नावांचे एक महान संत होते. त्यांचे पाशी बाबा राहिले व खूप विद्या शिकले.

पुढे कालांतराने येथून बाबा जे निसटले ते पायी पायी दावणगिरीस आले व तेथल्या स्वामी शिवानंदांच्या मठात येऊन दाखल झाले. तिथे त्यांनी विचार सागर पंचदशी, योगवासिष्ठ, पंचीकरणी, वेदांत ग्रंथ यांचा अभ्यास केला. पुढे ते काशीस आले व तेथल्या शैव आचार्यांच्या कुटीत राहून शैव सिद्धांताचा अभ्यास केला. आयुर्वेद शिकून घेतला व अनेक व्याधिग्रस्तांना औषधपाणी देऊन व्याधीमुक्त केले. येथेच त्यांनी पाकशास्त्र, काव्यशास्त्र व सन्तवाङ्मूय इ० धार्मिक ग्रन्थांचा अभ्यास केला.

या साधना काळात बाबांना अनेक अडचणी आल्या. पण त्यांनी अन्ननिवाऱ्यासाठी कुणाकडेही हात पसरला नाही. कित्येकदा उपाशी रहाण्याचे प्रसंग आले पण या प्रसंगी चक्क पाण्यात माती कालवून ते पाणी पीत तर कित्येकदा काशीच्या पापहारिणी गंगेत सोडलेले पिंड खाऊन त्यांनी आपली भूक शमविली आहे. हरिद्वाराला असताना-कडक थंडीत केवळ एका पंचावर त्यांनी दिवसचे दिवस काढले आहेत. पण स्वाभिमानी वृत्तीने राहून त्यांनी कुणाकडे याचना कधी काळी केली नाही. काशीत बाबांना लिंगानंद स्वामी नामक अवधूत भेटले. त्यांचे जवळ त्यांनी योगसाधने शिकून घेतली. त्यावेळी त्यांचे वय अवघे २२ वर्षांचे होते. पण येथपर्यंतच्या कालात त्यांना आपले गुरुजी श्रीनित्यानंदजी यांचे दर्शन घडलेच नाही.

काशीहून फिरत फिरत बाबा महाराष्ट्रात आले. नाशिक, जळगाव, चाळीसगाव इ. ठिकाणी खूप खूप हिंडले. ते आता संन्यासी असल्याने त्यांचा एकाच ठिकाणी मुक्काम नसे. पुढे त्यांनी नाशिक जिल्ह्यात येवल्यापासून दोन मैलावर सुकी या ठिकाणी काही काळ वास्तव्य केले. तिथे मात्र त्यांना अनेक भक्त मिळाले. चाळीसगावजवळच्या कोकमठाण गावात एका भूत बंगल्यात , औरंगाबादजवळच्या पिंपळखोरा व गौताला या गावी बाबांनी पुढे वास्तव्य केले. विशेषतः पिंपळखोरा गावी गुंफेत जाऊन बाबा जप-तपास बसत तर गौताला येथे त्यांनी उग्र तपश्चर्या केली. इथे तर हिंस्त्र श्वापदे मोठ्या

प्रेमाने येऊन त्यांच्याजवळ बसत असत ही लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे. पुढे बाबांना पंढरपूरच्या प्रवासात दोन सिद्ध पुरुष भेटले. एक म्हणजे श्रीनरसिंह व दुसरे बापूभाई. पण येथवर भेटलेल्या सर्व संतपुरुषांत दोन पुरुषांची प्रामुख्याने गणना करावी लागेल. त्यापैकी एक म्हणजे नासिराबादचे श्रीझिप्रूअण्णा व दुसरे वैजापूरचे हरिगिरी बाबा. या दोघांचेही बाबांवर अलोट प्रेम होते. त्यांचेपाशी ते योगकार्य शिकले. आपल्या या येथवरच्या साधना काळात बाबांना सटाण्याचे पोपट महाराज, साकोरीचे उपासनी बाबा, गोंडलचे प्रकाशानंद, द्वारकेचे सीताराम बैरागी, लासलगावचे भगरी बाबा, केडगावचे नारायण महाराज, मौनी बाबा, पैठणचे चैतन्य-स्वामी, मुंगसोजी बाबा, जामनगरचे प्रेमभिक्षु, अहमदाबादचे जगन्नाथ बाबा, रमण महर्षि इ. थोर संत, महात्मे व सिद्ध पुरुष भेटले.

अशा प्रकारे इतके वर्षे पायपीट करीत करीत बाबा अखेरीस गणेशपुरीस आले व मग त्यांना आपले गुरु श्रीस्वामी नित्यानंदजींचे दर्शन घडले. त्यांना अत्यानंद झाला. ते बाबांच्या जवळ उभे राहिले. तेव्हा नित्यानंदानी त्यांचेकडे निरखून पाहिले व म्हणाले, " अरे अखेर तू आलास तर ! " नित्यानंदजी त्यांची जणू प्रतीक्षाच करीत होते. बाबांची सद्गुरुंची भेट झाली. पुढे नित्यानंदानी आपल्या पादुका काढून त्या बाबांच्या झोळीत टाकल्या. बाबांनी त्या आपल्या मस्तकी धारण केल्या. नंदांनी बाबांना दीक्षा दिली. " ॐ नमः शिवाय " चा मंत्र दिला. त्यांच्या मस्तकावर हात ठेवला; व आश्चर्याची गोष्ट बाबा त्याच क्षणी गाढ समाधीत गेले. समाधीतून बाहेर आल्यावर त्यांना दिव्य साक्षात्कार घडला. नित्यानंदानी दीक्षा दिल्यावर बाबांची कुंडलिनी जागृत झाली व त्यांना शक्तिपात दीक्षाही बाबांकडून मिळाली. नित्यानंदानीच पुढे त्यांचा " परमहंस " असा सुयोग्य शब्दात गौरव केला.

१९५६ साली नित्यानंद बाबांनी मुक्तानंदांची गणेशपुरी येथे राहाण्यासाठी उत्कृष्ट सोय करून ठेवली. १९६१ साली नित्यानंदजी समाधिस्थ झाल्यावर आज गणेशपुरीचे सर्वाधिकारी म्हणून बाबाच ओळखले जातात. श्रीमुक्तानंद बाबा अतिशय थोर गुरु आहेत. साक्षात्कारी पुरुष आहेत. ते नाथ पंथातले दत्तसंप्रदायातले होत आणि म्हणूनच की काय आपल्या गुरुदेवांच्या आरती मध्ये 'नित्यानंद तूचि दत्त' म्हणून ते त्यांना हाक मारतात. आपल्याकडे येणाऱ्या शिष्याचे व्यक्तिमत्व बाबा घडवितात. मोह, अभिलाषा, आसक्ति इत्यादी त्यांचे दुर्गुण प्रथम नामशेष करतात. तसेच आळस, अहंकार, अज्ञान व खोटेपणा हे अवगुण नष्ट करतात व साधकाला अंतर्बाह्य शुद्ध करतात. ते आपल्या शिष्याला अध्यात्माचे पालन करण्यास व शिस्त

पाळण्यास कटाक्षाने भाग पाडतात; व आपले सूक्ष्म स्वरुप दाखवून त्याचा आत्मविश्वास वाढवितात. श्री बाबांनी दोनदा विश्वयात्रा केलेली आहे; गेली दोन वर्षे ते अमेरिकेतच होते. गेल्या दिवाळीस ते भारतात परत आले. अमेरिकेत बाबांना हजारो अनुयायी मिळाले. ते सारेच्या सारे त्यांना सोडायला अजिबात तयारच नाहीत.

प्रत्येक धर्मात भक्ति, योग व ज्ञान हे तीन दिव्य मार्ग असून ते एकमेकांना पूरक असेच आहेत. जप, ध्यान, निर्गुण उपासना, भक्तियोग हीच साधना ईश्वर प्राप्तीचा उपाय आहे असे बाबा आत्मविश्वासाने सांगतात. ज्याच्या मनात अखंड गुरुस्मरण चालते त्याला सर्व देवता प्रसन्न होतात. त्याला सर्व सिद्धी प्राप्त होतात. त्याला मंत्र फलदायी ठरतो, व तोच संसारात राहून ईश्वर प्राप्ती करून घेऊ शकतो. सर्व धर्मात परमेश्वर सारखाच आहे. त्याला तुम्ही कोणत्याही नावाने हाक मारा, तो ओ देईल व तुमच्याकडे धावून येईल असे श्रीमुक्त;नंद बाबा नेहमीच सांगत असतात.

विसाव्या शतकातले थोर साक्षातकारी सत् पुरुष श्रीमुक्तानंद बाबा श्रीसाईबाबांच्या शिरडी क्षेत्री शुभ कार्यासाठी येत आहेत. त्यांचे आम्ही मनःपूर्वक स्वागत करतो. त्यांचे शुभंकर येथल्या वास्तूला लाभून त्यांचा उत्कर्ष होवो अशी शुभेच्छा प्रगट करतो.

●

# श्रीसाईनाथ महाराज आणि श्रीगुरुदेव नित्यानंदजी

● दोन सत्पुरुषांची तुलना करणे हे महाअज्ञानाचे लक्षण आहे. शिर्डीचे श्री साई-नाथ महाराज आणि गणेश पुरीचे श्री नित्यानंदजी यांच्यात बरेच साम्य आढळून येते.

पहिले आणि चटकन नजरेत भरण्यासारखे जे साम्य आहे ते म्हणजे त्यांचे जन्म-रहस्य. मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्यात धूप नावाचे एक खेडे आहे. तेथल्या चांदभाई नावाच्या एका सधन गृहस्थाची आवडती घोडी हरवली होती व तिचा शोध करीत करीत रानात फिरत असताना त्याला श्रीसाईनाथ दिसले होते. त्यांनीच मग

चांदभाईची घोडी तात्काळ शोधून दिली. पुढे याच चांदभाईच्या बायकोच्या भाच्याची सोयरीक शिर्डी येथील एका मुलीबरोबर ठरली व त्या लग्नाच्या वऱ्हाडातून चांदभाई-बरोबर श्री साईबाबा प्रथम शिर्डीस आले. ही सर्व मंडळी गावाबाहेरच्या खंडोबाच्या देवळासमोर उतरली होती. तेव्हा त्या देवळाचे मालक म्हाळसापती हे तिथे उतरलेल्या तरुण साधूचे अलौकिक तेज पाहून म्हणाले " आओ साईबाबा " आणि तेव्हापासून त्यांना तेच नाव प्राप्त झाले.

श्री गुरुदेवानांही त्यांच्या अगदी बालवयात कोईमतूर शहरात श्री ईश्वर अय्यर यांनी प्रथम पाहिले व ओळखले. या सदा आनंदात रहाणाऱ्या, असणाऱ्या योगी-राजाला कुणीतरी " नित्यानंद " या नावाने संबोधले आणि म्हणूनच त्यांना ते नाव कायम पडले.

श्रीसाईबाबा शिर्डीस गुरुपादुकास्थानी तेथल्या कडुनिंबाच्या झाडाखाली तप करताना दिसले. नंतर ते अदृश्य झाले व बारा वर्षानंतर चांदभाई बरोबर पुन्हा शिर्डीस आले. साईबाबा मूळचे कुठले, त्यांचे आई वडील कोण होते, जन्म कुठे झाला बालपण कसे गेले इ. ची माहिती नाही, कुणीही त्यांच्या वयाचा योग्य अंदाज करु शकले नाही. इतकेच नव्हे तर ते हिन्दु की यवन याबद्दल अनेक वाद झाले. पण त्यातून काहीच निष्पन्न न होता बाबांचे जन्मरहस्य कुणालाच समजले नाही.

श्रीगुरुदेव नित्यानंदांच्या बाबतीतही तसेच झाले. कोईमतूर मध्ये ते ईश्वर अय्यरना दिसण्यापूर्वी कुठे होते, त्यांचे आई वडील कोण, ते कुठे जन्मले, त्यांचे बाल-पण कसे गेले. इ. संबंधीची माहिती मिळत नाही.

श्रीसाईनाथांनी बालपणात कडूलिंबाच्या झाडाखाली तप केले. तर नित्यानंदानी बालपणातच हिमालयात जाऊन सहा वर्षे वानरी तप केले. दोघेही जन्मतःच सिद्ध पुरुष होते यात तर वाद नाही.

साईनंद सुमारे पन्नास वर्षे शिर्डीत राहिले. या अवधीत ते फक्त शेजारच्या निम-गाव व राहते या दोन गावानाच अधून मधून भेट देत. नित्यानंदानी सर्व मंगरुळ प्रांतात संचार केला. त्याशिवाय त्यांनी सर्व तीर्थ क्षेत्रे पाहिली. श्रीसाई औरंगाबादवरून शिर्डीस आले खरे, पण त्यांनी यापूर्वी प्रवास केला नसेल असे म्हणता येत नाही.

या दोन महापुरूषांनी शिर्डी व गणेशपुरी सारखी खेडीच पसंत केली व त्यानंतर त्या स्थानांना फार मोठे महत्व प्राप्त झाले.

श्रीसाई प्रथम शिर्डीला गेले तेव्हा ते अगदीच लहानसे खेडे होते. तेथले रहि-वासी गरीब होते, व सध्या ज्या ठिकाणी समाधिमंदिर, गुरुपादुका इ. स्थाने आहेत,

तिथे पूर्वी रान होते व सुरवातीला तिथे दर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांना काटेकुटे तुडवून मोठ्या कष्टाने मार्ग काढावा लागत असे. शिर्डीमध्ये गणेशपुरीप्रमाणे वाघासारखी क्रूर श्वापदे नसली तरी तिथे साप विन्चू इ. प्राण्यांचा तेथल्या जनतेला उपद्रव होत होताच. पण या दोन सत्पुरुषांच्या वास्तव्याने या दोन स्थळांचा संपूर्णपणे कायापालट झाला आहे, हे कुणालाही नाकबूल करता येणार नाही.

आज शिर्डी हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र बनले तिथे श्रीसाईबाबांची समाधी असल्यामुळे सर्व सुखसोयी उपलब्ध आहेत.त्याठिकाणी डाकघर, दूरध्वनी, शाळा, वाचनालय, रूग्णालय, पक्के रस्ते, बाजारपेठ, उपहारगृहे आहेत. इकडे गणेशपुरी तर साक्षात अमरपुरीच बनली आहे या दोन्हीं ठिकाणची सामान्य जनता आज पूर्वीपेक्षाही अधिक पटीने सुखी बनली आहे.

एक फरक मात्र जाणवतो तो हा की, साईबाबा समाधिस्थ झाल्यावर शिर्डीला आजचे वैभव प्राप्त झाले. बाबा तिथे असताना त्या ठिकाणी ज्या काही इमारती बांधण्यात आल्या होत्या, त्या त्यांच्या भक्तांनी बांधल्या होत्या. उदा– काकासाहेब दीक्षितांचा वाडा, नवलकरांचा वाडा, श्रीमंत बुटींनी त्याठिकाणी बाबांच्या परवानगीवरून राधाकृष्णाचे मंदिर बांधले होते, त्याच ठिकाणी सध्या बाबांची समाधी आहे.

पण गणेशपुरीच्या भगवंताने स्वतःच रस्ते, धर्मशाळा, देवालये, कुंडे, विहिरी, शाळा, डाकघर वगैरे बांधकामे केली. त्याठिकाणी लागणारा पैसा त्यांनी स्वतःच निर्माण केला. इतकेच नव्हे तर या कामासाठी ते मजुरांबरोबर स्वतः राबले होते.

१९३६ साली गुरुदेव गणेशपुरी येथे आले व तेव्हापासून त्या स्थानाचा काया-पालट होऊ लागला. योगायोग असा की त्याच सुमारास शिर्डीच्या आजच्या वैभवाचीही सुरवात झाली.

चमत्कारांच्या बाबतीत या दोन महापुरुषात साम्य आहे. साईबाबांनी आपल्या भक्तांसाठी अनेक चमत्कार केले होते. तेही गुरुदेवांप्रमाणे जात-पात, धर्मभेद इ. न मानता अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी अहोरात्र झटत होते. त्यांनीही अनेकांच्या मनोकामना पूर्ण केल्या, कित्येकांचे दुःसाध्य रोग बरे केले- मानवाची सत्प्रवृत्ती जागी होऊन त्याचे देवधर्माकडे लक्ष लागावे यासाठी ते झटले.

गणेशपुरीच्या भगवंतानेहीं चमत्कारांच्या बाबतीत काही कमतरता ठेवली नाही. पण दुःखीताना सुखी बनविणे, अभाविकांना भाविक बनवून त्यांची धर्मावर परमेश्वरावर श्रद्धा जडविणे हे श्रीसाई बाबांचेच कार्य बेफाम वेगाने त्यांनी केले.

श्रीसाईबाबा पायघोळ कफनी चढवीत व डोक्याला शुभ्र वस्त्र बांधीत तर श्रीगुरुदेव फक्त लंगोटीवरच भागवित. बाबा स्वतः आपल्या पेहेरावाच्या बाबतीत उदासीन

होते पण केवळ आपल्या भक्तांच्या आग्रहास्तव ते स्वतःची पूजा अर्चा करवून घ्यायचे. दर गुरुवारी त्यांच्या अंगावर नाना प्रकारचे अलंकार चढविण्यात येत व त्यांची द्वारकामाईपासून चावडी पर्यंत मिरवणूक काढण्यात येत असे. त्यांचा तो पालखीचा सोहळा मोठा नेत्रदीपक होता.

गणेशपुरीचे हे संत मात्र असल्या पालखी मिरवणुकीच्या फंदात कधीच पडले नाहीत. त्यांनी आपल्या भक्तांकडून आपली पूजा अर्चा करविली नाही. जे कुणी भक्त नारळ, फुले इ. वस्तू घेऊन जात त्या गुरुदेवांपासून काही अंतरावर ठेवाव्या लागत; व त्या लागलीच गोरगरीबांना व मुलांना वाटण्यात येत. श्री नित्यानंद त्यातील कशालाही स्पर्शही करीत नसत.

श्रीसाईबाबांना कधी पैशाचा तोटा नव्हता. ते आपल्या कफनीच्या खिशात हात घालीत व त्यांची इच्छा होईल त्याला वाटेल तितके देत. पण ते भक्तांनी दिलेल्या दक्षिणेचा स्वीकार करीत इतकेच नव्हे तर कित्येकदा दक्षिणेसाठी भक्ताजवळ हट्टही करीत.

श्री नित्यानंदांनाही कधीच पैशाची उणीव भासली नाही. त्यांनी कुणाजवळही एकही पै न घेता लक्षावधी रुपयांची बांधकामे केली. भक्तांकडून त्यांना जो पैसा मिळे त्याचा विनियोग त्यांनी बाल भोजनगृहासाठी केला. त्याठिकाणी रोज हजारो मुलांना अन्नदान करण्यात येई.

या दोघाही सतपुरुषांनी भक्तांना निरनिराळ्या स्वरुपात दर्शन घडविले आहे. दोघांनी कधीच स्वमुखाने प्रचार केला नाही. पण त्यांच्या दर्शनातच इतके सामर्थ्य आहे की, हजारो व्याख्यानापेक्षा त्यांचे मूक व्याख्यान प्रभावी असे.

श्री गुरुदेव नेहमी कैलास आश्रमात बसलेले असत तर श्रीसाईबाबा नेहमी आपल्या मशिदमाईत असत. ज्यांची पात्रता नसेल अशांना श्रीसाईंचे दर्शन घडत नसे. " माझी इच्छा नसताना माझ्या मशिदीची पायरी कोण चढू शकेल ? असे साईबाबा म्हणत, त्याचप्रमाणे " माझी इच्छा होईल त्याला मी पायाला दोरी बांधून पाखराप्रमाणे फडफडत ओढून नेईन " असेही ते म्हणत व त्याप्रमाणे घडतही असे.

गणेशपुरीतही तोच प्रकार आढळत असे. गुरुदेवांची इच्छा असल्याशिवाय त्यांचे दर्शन घडणे शक्य नसे, याचा अनुभव अनेकांना आलेला आहे. श्रीसाईबाबा व श्री नित्यानंद महाराज या दोघांनीही आपल्या पूर्वीच्या महात्म्यांची थोर परंपरा चालू ठेवली.

●

# युगावतार श्रीसाईबाबा : ८

( श्रीसाईबाबा सत्संग मंडळ, सुरत ह्यांच्या सौजन्यानें )

अनु :- श्री. चंद्रकांत दामोदर सामंत
ताडदेव, मुंबई ४०० ००७

● श्रीयुत शांतीलाल बारिया हे श्रीबाबांचे एक परम भक्त मुंबईच्या माटुंगा विभागात राहत. शिरडीला जाऊन श्रीसाईनाथांचे दर्शन घेण्याची त्यांना बऱ्याच दिवसापासून तळमळ लागली होती. अगदी प्रथम म्हणजे १९५४ साली त्यांना जाणे जमले नाही. त्यांच्या पत्नीने त्यांना ठामपणे सांगितले होते की, ज्या क्षणी श्रीबाबांची आज्ञा होईल तेव्हाच शिरडीस जाणे होईल. करता करता एकदा रामनवमीच्या आदल्या दिवशी शिरडीस जाण्यासाठी शांतीलाल सहकुटुंब दादर स्टेशनवर गेले. तिकीटे खरेदी करून मंडळी गाडीची वाट पाहत उभी होती. इतक्यात, लेंगा व बुशकोट घातलेला एक इसम त्यांच्याजवळ आला व त्याने शांतीलालना, ;" तुम्ही शिरडीला जात आहात ना ? " असा रोकठोक सवाल केला. शांतीलालनी त्याला होकार दिल्यावर तो अनोळखी इसम त्यांच्याबरोबर कोपरगांवपर्यंत गेला. कोपरगाव स्टेशनबाहेर रामनवमीनिमित्त शिरडीला जाणाऱ्या भक्तांची तुफान गर्दी उसळली होती. गर्दीत त्या इसमाची व शांतीलालची चुकामुक झाली. पहाटे पाच वाजण्याचा सुमार होता, खूप अंधार होता शांतीलाल आपल्या कुटुंबियासह रेल्वे फाटकातून बाहेर पडले व बाहेर उभ्या असलेल्या एका बसमध्ये चढून बसले. थोड्याच वेळात बस पूर्णपणे भरली आणि ड्रायव्हरने हॉर्न वाजवून सुटण्याची सूचना दिली. बस निघणार इतक्यात तोच इसम परत शांतीलाल ज्या बाजूला बसले होते त्या खिडकीपाशी आला व विचारु लागला. " काय, जागा नीट मिळाली ना ? आपण आता शिरडीत भेटूच ". एवढे बोलून तो मनुष्य दिसेनासा झाला. त्यानंतर त्यांना तो शिरडीत परत दिसला नाही. वरील प्रसंगावरुन शांतीलालची खात्री झाली की, केवळ त्यांच्या मनातील संभ्रम दूर करण्याकरिताच व त्यांना शिरडीस सुखरुपणे पोहचविण्याकरिताच श्रीसाईनाथांनी सगुणरूप धारण करुन त्यांना शिरडीपर्यंत सोबत केली.

●

# बाबांच्या उदीने दुखणारा पाय बरा झाला

**सौ. विमलादेवी**
श्री जगदीश मंदिर, नागपूर.

● दोन वर्षापासून माझा डावापाय सतत दुखायचा. कधी क धी असह्य त्रास व्हायचा खाली बसणे कठीण होत होते. डॉक्टरकडे जाऊनही काही उपयोग झाला नाही शेवटी मनात निराश झाले. पण १९७६ च्या दिवाळीमध्ये पायाचे दुखणे अधिकच वाढले, व असह्य त्रास होऊ लागला. त्यावेळेस बाबांच्या पोथीचे पारायण सुरु होते. पण पायाच्या दुखण्यामुळे माझ्या नित्यकर्मात व्यवधान पडले. खाली बसून पूजा-अर्चा करणे व पोथी वाचणे जड जाऊ लागले, आणि त्याच सुमारास म्हणजे ऐन दिवाळीच्या दिवशीच श्रीसाईलीलेचा दिवाळी-विशेषांक हाती आला. अधिरतेने वाचून काढला. त्यातील साईभक्तांचे अनुभव वाचून मन गहिवरुन आले व मनात म्हटले बाबा मी सुद्धा आपली भक्त आहे ना ? मग माझा दुखणारा पाय का बरे बरा करीत नाही ? ही वेदना मला असह्य होत आहे. मी जर खरोखरच साईभक्त असेन तर माझा पाय बरा होईल. असे म्हणून दिव्यातील तेल व उदी पायाला चोळली व निश्‍चिंत झाले. आणि आश्चर्य हे की दुसऱ्या दिवसापासून पाय दुखणे एकदम बंद झाले. पुन्हा पुन्हा बाबांना दंडवत घालून म्हटले, बाबा आपली केवढी ही महान किमया व बाबांविषयींच्या भक्ती-भावनेने मन भरुन आले. आज मी संपूर्ण निरोगी देहाने संत सेवेस सज्ज आहे. माझे हे कथन श्रध्देविना उमगणे नलगे ।

" पूजा की रीत न जान सकी ।
एक प्रीत की रीत निभाती हूँ ।
साईनाथ तुम्ही सब कुछ मेरे
पद-रज को शिश चढाती हुँ
तुमही हमारे दाता और माता पिता
तुमही तो है सब भक्तों के संकट हर्ता "।

# जाण भाव माझ्या नजरेतला

**श्री. जे. व्ही. घाटगे,**
१७६१, राजारामपुरी, २री गल्ली,
कोल्हापूर.

तुमही हमारे दाता और माता पिता
तुमही तो है सब भक्तों के संकट हर्ता

* सर्व साई भक्तांना हा अनुभव त्यांच्या जीवनात एकदा अगर अनेकदा आला असेलच, 'श्रीसाई' भक्त म्हटला की, त्याला एकदा तरी प्रचिती आलेली असतेच. हेच तर 'श्रीसाई' माऊलीचे वैशिष्ठय आहे. त्यामुळे दिवसेनिदिवस 'श्रीसाई' भक्तांची वाढ होत आहे. हजारो भक्त मंडळी 'श्रीसाई' दर्शनासाठी शिर्डीस जातात व आनंद पावतात.

या भक्त मंडळीत काही भक्त 'श्रीसाई' स एखादा नवसही बोलतात, व उपवास करतात आणि इच्छित मनोकामना पूर्ण झाल्यावर पुनरपि शिर्डीस येतात व परत जाते वेळी पुन्हा 'श्रीसाई'स एखादे साकडे घालतात, आणि अशा प्रकारे 'श्रीसाई माऊली' व त्यांचे भक्त यांची देवाण घेवाण चालूच राहते. 'श्रीसाईमाऊली' आकाशाएवढ्या विशाल अंतःकरणाची आहे, म्हणूनच ती आपल्या सर्व भक्तांची मनोकामना पूर्ण करते, आणि अशीच ती करीत राहणार आहे. मागणाऱ्याचे मागणे संपत नाही, आणि 'श्रीसाई' देण्याचे थांबत नाही. 'श्रीसाईबाबा म्हणतात, 'अल्ला तुम्हारा भला करेगा, सबको सब मिल जायेगा, लेकिन बेटा जरा सबूरी करना, सबूरीसे सब काम हो जाएगा" पण ज्या त्या भक्ताला घाई झालेली आहे की, 'श्री साई बाबा' आपणाकडे अजून लक्ष का देत नाहीत.

'श्री साईमाऊली' चे त्यांच्या सर्व भक्तांवर लक्ष आहे, कारण सदैव त्यांची नजर आपल्यावरच आहे. पहा ते आपणाकडे कसे टक लावून पाहतात, त्यांची नजर आपला शोध घेत आहे, ती नजर आपणांस काही तरी सांगते आहे पण त्या नजरेचा अर्थ आम्ही भक्त समजू शकत नाही. आपण सर्वच त्यांचे मुखकमल पाहतो, पण त्यावेळी आपल्या मनात कुठेतरी सूक्ष्म स्वार्थाची भावना दडलेली असते आणि त्या स्वार्थातूनच आपण 'श्री साईबाबां' चे दर्शन घेत असतो, त्याच भावनेतून त्यांच्या मुखकमलाचे अवलोकन करीत असतो आणि म्हणूनच की काय त्यांच्या नजरेतला भाव, त्यांच्या मुखकमलावरचा भाव आपण कदाचित समजू शकत नाही.

कोणी भक्त असे समजू शकतील की, आपल्या सर्व भक्तांची विवंचना 'श्रीसाईबाबांना' असू शकेल, आणि त्या सर्वांचे निवारण कशा प्रकारे करायचे

याच्यामध्ये ते मग्न असतील. किंवा असेही ते म्हणू चकतील कीं, कोण कुठल्या भावनेने त्यांच्याकडे पाहतील तसे ते दिसतील. असं जरी म्हटले तरी पण निश्चित अंदाज करणे अवघड आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

'श्री साईबाबांचे' मुखकमल हे एक महान गूढच आहे, भव्य गंभीरतेची झलक आहे. अनंत असूयेची प्रभा आहे, अमर्याद औदार्याची खाण आहे. अनंतकोटी ब्रह्मांड नायकाची महानता आहे. विश्व जादूगाराच्या किमयेचे आवाहन त्यांच्या नजरेत आहे. त्यांच्यात काय नाही ? तसं म्हटले तर आपल्या सारख्या मामुली भक्ताची लायकी नाही, की, त्यांचे दिव्य गूढ ओळखण्याची. आपण काही आध्यात्मिक संशोधक थोडेच आहोत ? काय करायचं आहे एवढ्या खोलात शिरून. आपले मागणे काय आहे आपलं दुखणं काय आहे एवढेच त्यांच्यापुढे निवेदन करायचे आणि त्याची पूर्तता कधी होते याची वाट पहात रहायचे, आपण आपली सर्व जबाबदारी त्यांचेवर सोपविली आहे, आणि 'श्री साईबाबांनी' तसे कबूलही केले आहे की, 'माझा जो झाला त्याचा सर्व कार्यभार मी वाहीन' आणि हे आपण सर्व भक्त अनुभवतो.

आपण दरवर्षी अगर आपल्या सोई प्रमाणे शिर्डीस जातो; अभिषेक करतो. यथाशक्ति काही देतो. नवस असेल तो फेडतो. आपण आपले वचन पाळतो, आणि परत निघताना अनेकवार प्रणाम करतो त्यांचे समोर लोटांगण घालतो वमनातून पुन्हा एक छोटिशी मागणी हळूच त्यांचेवर सोपवितो. एक इच्छा त्यांचे चरणावर सोपवून घरी परततो, त्यावेळी 'श्री साईमाऊली' आशिर्वाद देते 'अल्ला तेरा भला करेगा'

प्रेमळ श्रद्धाळू भाविक 'श्रीसाई' भक्त सज्जन वाचकहो, ही एक व्यथा आहे आपणा 'श्री साई' भक्तांची. आपण अतीहीन, अती अल्पमति क्षणोक्षणी पावलागणिक चुका करणारे ( पण स्वतःला धन्य समजणारे ) असे आहोत. आपणा सर्व 'श्रीसाईभक्तांची' सत्य परिस्थिती आहे, ही एक सत्य व्यथा आहे आणि ही दडली आहे स्वार्थी लौकिक याचनेच्या उबेत. आपण सारे स्वार्थाचे सोबती ! कोण आहे 'श्रीसाईबाबांचा' सच्चा प्रेमी सोबती ? कोण आहे निस्वार्थी याचे उत्तर ज्याचे त्यालाच ठाऊक आहे. आपल्या स्वार्थाची पूर्ती करण्यास 'श्रीसाईमाऊली' सदैव तत्पर आहे.

हजारो 'श्रीसाई' भक्त दरबारात येऊन जातात, पण बहुतेक जण विसरतात, त्यांचे मुखावलोकन. आपण मुखावलोकन करतो पण खऱ्या अर्थाने नव्हे, कारण ही गोष्टच आपल्या लक्षात येऊ शकत नाही. अपेक्षा, स्वार्थ यांनी आपण भारलेलो आहोत. आपणाकडून 'श्रीसाईमाऊलीला' काही अपेक्षा असू शकेल काय ? हा विचारच मनास शिवू शकत नाही. ही विचारसरणी चमत्कारिक वाटते, कारण सर्व विश्वाला पुरुन उरण्या इतपत त्यांच्या जवळ असतांना, आपणा भक्ताकडून त्यांची काय अपेक्षा असू शकेल ?

'श्री साईमाऊली' आपणा भक्तांना म्हणते, या भक्तांनो या मी तुमची वाट पहाते आहे, तुम्ही माझ्यासाठी शिर्डीस येता आणि माझं एवढं कोड कौतुक करता. दही, दुध, साखर तुपाचे स्नान घालता, उन्ची अत्तरानी माझ शरीर दरवळून टाकता, माझ्या शरीरावर सुंदर वस्त्र अलंकार भूषणाचा साज चढविता, नाना सुगंधी फुलांनी बहरुन टाकता, हे सारं सारं कशासाठी ? एवढा सोपस्कार कशासाठी ? माझ्या प्रेमासाठीच ?

मी तुमच्या सर्व मनोकामना पूर्ण करतो म्हणून ? तुमचे असाध्य आजार बरे करतो म्हणून ? अनेकांचे दारिद्य नष्ट केले म्हणून ? माझी एवढी बडदास्त कशासाठी ? मला हे सारे सहन होत नाही. मला केवळ तुमच्या आवडीसाठीच सोपस्कार करून घ्यावे लागतात, नाहीतर तुम्ही माझ्यावरती नाराजही व्हाल. कदाचित माझ्या शिर्डीस येण्याचेही सोडून द्याल, म्हणूनच हे सर्व सहन करून मी माझ्या भक्तासाठी रात्रंदिवस शिर्डीत राहून, तुमच्यावर पहारा करीत असतो. जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात माझ्या भक्तांनी मला साद घातल्यावर त्यांच्यासाठी धावून जातो.

तरीही पण 'श्री साईमाऊलीचे' मुखकमल कुठल्यातरी अनामिक ओढीने व्याकूळ आहे, त्यांची नजर कशाचा तरी शोध घेत आहे, कशाचे तरी गूढ आहे. म्हणूनच हे गूढ जाणणारा धन्य, खरोखरीच धन्य तो पुरुष, धन्य तो 'श्री साईभक्त की जाणला भाव ज्याने 'श्री साई' नजरेतला.

●

# वाऱ्यावरचे विचार

—द. शं. टिपणीस
वजिफदार लॉज,
गोखले रोड, ठाणे.

## साबण

● साबू उर्फ साबण हा आज जीवनावश्यक वस्तूपैकी एक झाला आहे. साबणा वाचून आमचं स्नान अडून बसते. पूर्वी स्नानाच्या वेळी स्तोत्राची आठवण होई. आज साबणाची होते. साबणावाचून आमचा संसार चालत नाही. तेल, तूप व घासलेट आदी प्रमाणे तो नसला तर आमचे जीवन-खाणेपिणे अडून राहील काय ? आता श्रीमंत व मध्यमवर्गीय यांना साबणाशिवाय स्नान कसेसेच वाटतं हे खरं. पण त्यांचे जेवण-

खाण अडून राहणार नाही. साबणाचे फाजील महत्व व्यापारी, हौशी व शौकीन लोकांनी वाढविले आहे. पूर्वी भांडी घासायला माती चाले. पण तिथेही साबणा शिवाय भागत नाही. पिढ्यान पिढ्या मातीनं हात बरबटलेल्या मोलकरणीचेही साबू पावडर शिवाय पान (ताट) हालत नाहीं. अंगाचा, कपड्याचा, भांडी घासण्याचा, कुऱ्याचा, पातळ, चुरा, जेली वगैरे साबणाच्या नाना तऱ्हा आहेत.. जीनावश्यक वस्तूत साबणाने नंबर पटकावला आहे. पूर्वी माती व रिठे यांवर सर्व स्वच्छता खूष होती. तसं पाहिलं तर वेदकालात साबण ही चीज अस्तित्वात नव्हती. असे असूनही वेदकाळचे लोक अस्वच्छ होते असा कोणी कुठे उल्लेख केलेला पहाण्यात नाही. कदाचित उलटच असावे. ते लोक अधिक स्वच्छ, निर्मळ असावेत असं आज वाघधरे, व्रिटेक्स आदीच्या बाजारात होणाऱ्या खपावरून वाटते. शारिरीक अस्वच्छता केवळ बाहेरून येत नसून बरीचशी आतून येते, हे आम्ही विसरतो. पूर्वी लोक मातीचा उपयोग साबणासारखा करीत. मातीत पुष्कळ औषधी गुणधर्म आहेत. म. गांधी अंगाचा साबण वापरत नसत. ते माती वापरत असं म्हणतात. तरी ते निर्मळ होते. म. गांधीचे जीवन अंगाच्या साबणाशिवाय अडून बसले नाहीं. मग साबण गायब झाला, महाग झाला म्हणून आपण अडून का बसावे व हाका कां करावी ? शोध घ्या. म्हणजे आम्हीच आमच्या भोंवती नाना अनावश्यक वस्तूंची कुंपणे घालून त्यात स्वतःला अडकवून घेतो व मग अडी अडचणी आल्या की ओरडत बसतो हे लक्षात येईल. अंग व कपडे निर्मळ , स्वच्छ व नीटनेटके राखण्यासाठी आपण श्रम वेळ व पैसा भरपूर खर्च करतो यात वाईट काही नाही. करावं पण त्याच शरीरात असलेलं मन तितकच निर्मळ व स्वच्छ राखण्याकडे आपण लक्ष का देऊ नये. कपडे व अंग स्वच्छ असले तर जीवन अस्वच्छ होईलच असं नाही. पण मन अस्वच्छ असलं तर जगणं जीवनच अस्वच्छ व टाकाऊ होईल हे निश्चित, असं आहे तर मग अंगाच्या साबणासाठी आपण जेवढा अट्टाहास करतो तेवढाच सत्संगती, सुविचार, उच्च ध्येय आदी कंपन्यांचा मनाला निर्मळ करणाऱ्या साबणासाठी का करूं नये ?

## जुनं ते सोनं

जुनं ते सोनं हे आजच्या तरुणांना मान्य नाहीं. जुनं ते खोटं, जुनं हटाव पण नवीन काय बनाव ? कोणालाच उमगत नाही. जे जे जुनं मग ती रूढी असो, धर्म असो कपडेलत्ते असो नाहीतर आणखी काही असो, ते सर्व टाकावू आऊट ऑफ फॅशन. अहो, माणूस जुना झाला म्हातारा झाला, की झालाच टाकावू. जणू अडगळ आजचं जुनं हे एका काळचं नवीनच होतं व आजचं नवीन हे उद्याचे जुनंच होणार, काल्ची

फॅशन आज जुनी. मग नवीन पाहिजे. माणूस नव्याच्या पाठी धावतो आहे. ज्याला त्याला नवीन घेण्याची हांव. कालच्या वस्तू आज मोडीत निघतात व नवीन घेतल्या जातात. जुनं मोड व नवीन जोड. नवीन ते सोनं एवढेच माहीत. पश्चिमेकडूनआलं ते तर अस्सल सोनं. मग ते मुळात लोखंड असो नाही तर पितळ असो, असा आहे आजचा जमाना. चांगल्या वाईटाचा विचार नाही. फेरीवाला आला, अल्लाउद्दीनचा दिवा दिला, आनंद झाला, फायदा उठवला फेरीवाल्यानं. घरोघरचं जुनं गोळा करून फेरीवाले आपले पोट भरत आहेत. जुनं त्यांचा अन्नदाता आहे. व्यापारी जुन्याचं सोनं करून लाखोनी कमावताहेत. यामुळं जुनं ते सोनं मानण्यापेक्षा जुन ते टाकाऊ समजणं हे राष्ट्राच्या अधिक हिताचे आहे. चुलीचा धूर होतो. शेगड्या उरल्या, चुली नाहींशा झाल्या, स्टोव्ह आला शेगड्या गैरसोईच्या ठरल्या. कोळसा काळे करतो म्हणून त्याला घरातून काळं करावं लागलं. गिझर आला. बंब फुंकून टाकला, गॅस आला, वा ! सगळ्यात सोईस्कर. स्टोव्ह पडला बाजूला. झाला निकामी कित्येकांचे स्टोव्ह, लोखंडी शेगड्या मोडीत गेल्या आणि मग गंमत झाली. स्टोव्हकडे वळले. तो घासलेट नाहीं. शेगडीकडे जावे तो कोळसा नाही म्हणून फाट्याकडे पहावे तों तीं रुसून बसलेली. कोळसा फुगला व शेगड्या महागल्या. पूर्वीच्या पाच पट किंमत देऊन विकत घेतल्या. पूर्वीच्या चुली व मातीच्या शेगड्या कधीच नाहीशा झाल्या होत्या. आता मातीही महागली अन्न शिजवणं अशक्य झालं. कुटुंबाच्या कंबरा मोडल्या गृहिणी रडकुंडीस आल्या. घासलेट मिळविण्यासाठी रांगेत उभे राहून राहून निर्जली एकादशी घडू लागली. हॉटेल खानावळवाले तंग झाले. एकटे जीव खरे सदाशिव ठरले. जुनं ते खोटं म्हणणाऱ्यांना निसर्गाने शिकविलं. वेळप्रसंगी जुनंही उपयोगी पडतं. म्हणून केवळ जुनं म्हणून माणसानं त्याला लाथाडू नये. जुन्यातून नवं उत्पन्न होतं. माणसानं जुन्यातलं चांगलं घेऊन त्यात भर टाकून नवीन घडवावं. जुना दागिना मोडून त्यात भर टाकून नवीन दागिना घडवतोच ना ? जुन्याला उगाच हिडीस फिडीस करण्यास काय अर्थ तसं पाहिलं तर ईश्वर सर्वात जुना, म्हणून काय त्याला मोडीत काढावा ?

## मोलकरीण

ती एक मोलकरीण होती. मोलकरणीच्या घरी जन्मास आली व भांडीकुंडी धुणं पाणी करी म्हणून मोलकरीण म्हणायचं. नाहीतर एखाद्या घरंदाज घराण्यातच शोभली असती. इमानी नि दुळदुळीत देवधर्म मानणारी. स्वतः सोवळं ओवळं करीत नसे पण दुसऱ्याने केलेलं समजत असे. ठरलेले काम ठरलेल्या वेळी बिनभोभाट करी. तिच्याकडे

घड्याळ नव्हते पण तिला घड्याळ कळत असे. वक्तशीर ठरलेल्या वेळेला कामाला येई व काम आटोपल्यावर इकडे तिकडे न बघता सरळ जाई. बडबड नाही की टकटक नाही. चहाच्या घोटाची आषक नव्हती की कोणाचे खाणं चालले असले तर तेथे घोटळणारी नव्हती. कामाचा उरक मोठा. दहा घरचं काम सांभाळी. अकरावं मिळावं म्हणून आणखी खटपट. मुघलं खाणं बाहेर सुटे. ती जात असे त्या घरी तिला स्वखुषीने खायला देत. कामधंदा करून शंभर रुपये मिळवी. घरचं चांगलं. गावी थोडी शेतीमाती व एक लहानसे घर. दुधदुभते पुरेसे नवऱ्याला कारखान्यात चांगली नोकरी. पगार चांगला मिळे. घरी दोन खानावळवालेही ठेवले होते. घरचं सगळं करी. भल्या पहाटे उठे. सगळं आटोपून सकाळी सहाला बाहेर पडे. ती पाचाला परत येई. तिनं एक मोलकरीण ठेवावी इतकं घरचं चांगलं असतानाही ती कष्टाचा उद्योग करी. मानी मोठी. कोणाचे फुकट घेईना. इतरांनी कमवावे आणि आपण फुकट खावे तिच्या मनाला पसंत नव्हते. बहुतेक मोलकरणी अशाच स्वतंत्र वृत्तीच्या असतात. कितीतरी कारखान्यात गेल्या. पण ही नाही. तेथले वातावरण तिच्या मनाला मानवणारे नव्हे. अशी ही रखमाबाई सर्वांना हवी हवीशी वाटणारी. तिला मागणी मोठी. तिचा वक्तशीरपणा व निमूटपणा हे गुण सर्वांना आवडत. अशी वक्तशीर, निरपेक्ष, अनासक्त स्त्री पांढरपेशांतही मिळणं कठीण. चिखलात कमळ उगवतं ते असं. कुणाच्या घरचं तिने काहीही ओव्यात घातले नाही. रिक्त हस्ते येई व रिक्त हस्ते जाई. तिच्याकडे पाहून विचाराचे वारे वाहू लागले. ठरलेल्या वेळेला यायचं व काम झाल्यावर जायचं हा निसर्गाचा दैवाचा नियम. रखमासारखं जावं रिक्तहस्ते आशा आसक्ती ठेवू नये. पुन्हा एकटं जाणे. सोबत फक्त देवाची. ती मिळावी म्हणून तर माणसाने जगायचं असतं.

●

# श्री. कृष्ण विष्णू सातर्डेकर यांचे निधन

सुविख्यात गायक आणि साईभक्त श्री. श्रीराम विष्णू सातर्डेकर यांचे धाकटे बंधू श्री. कृष्ण विष्णू सातर्डेकर यांचे मंगळवार दिनांक ८ फेब्रुवारी १९७७ रोजी माहिम येथे अपघाती निधन झाले. त्यांचे वय ५० वर्षाचे होते. ते साईभक्त होते. शिर्डी येथे व आपल्या आप्त, नातलग, मित्र परिवारात ते किशाकाका म्हणून ओळखले जात. परमेश्वर मृतात्म्यास सद्गति देवो.

## एक अवर्णनीय भूमिपूजन सोहळा :

# श्रीसाईबाबा मंदीर निर्माण प्रकल्प, नागपूर

● श्री साईबाबा सेवा मंडळ, नागपूर ह्यांच्यातर्फे श्री साईनाथांच्या प्रेरणेवरून नागपूरच्या वर्धा रोड वरील श्रीविवेकानंद नगर येथे एक श्रीसाईबाबा मंदिर उभारण्याची योजना हाती घेतली गेली आहे। ह्या मंदिराची आखणी भव्य स्वरुपाची असून नागपूरवासीयांचे बऱ्याच दिवसांचे एक स्वप्न निश्चितपणे साकार होण्याच्या मार्गावर आहे.

ह्या योजनेचा शुभारंभ गुरुवार दि. १६ डिसेंबर १९७६ रोजी सकाळी भूमिपूजनाने झाला. मंदिराच्या नियोजित जागेवर एक मंडप उभारण्यात आला होता. मंडप सर्व बाजूनी फुलांनी सुशोभित केला होता. प्रवेश केल्याबरोबर समोरच श्रीबाबांची एक भव्य व मनोहर तसबीर दृष्टीस पडत होती. तसबिरीच्या खालीच शिरडीहून आलेल्या श्रीसाईबाबांच्या पादुका दर्शनासाठी ठेविल्या होत्या. पादुकांच्या दोन्ही बाजूस चोपदार आपापल्या गणवेषात सज्ज होते. वातावरणात सर्वत्र सनईचे मंगल सूर व फुलांचा आणि उदबत्त्यांचा सुगंध दरवळत होता.

शिरडी संस्थानचे प्रमुख श्री. पाठक साहेब काही अपरिहार्य कारणामुळे येऊ न शकल्यामुळे समारंभाचे अध्यक्षस्थान मुंबईचे सुप्रसिद्ध श्रीसाईभक्त डॉ. के. भ. गव्हाणकर ह्यांनी भूषविले. होते. त्यांच्याशिवाय महाराष्ट्र विधानसभेचे सभापति श्री. शेषराव वानखेडे हेही प्रमुख पाहुणे म्हणून त्याप्रसंगी उपस्थित होते. शिरडीहून पादुकांसोबत सेवेकऱ्याखेरीज अधिक्षक श्री. घोडखिंडी, श्री. वागचे व मार्तंड भगत आले होते.

साकोरीच्या पूज्यसती गोदावरीमाता ह्यांच्या आगमनानंतर कार्यक्रमाला रीतसर सुरवात झाली. पुजाविधी नागपुरकरांचे लाडके श्रीसाईभक्त विजयबाबा ह्यांनी पार पाडले.

साकोरीच्या कुमारीकन्यांनी वेदपठण केले. सर्व उपस्थितांचे स्वागत श्री. उत्तरवार ह्यांनी केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. गव्हाणकर ह्यांनी श्रीबाबांची एक आठवण कथन केली. श्रीमंत गोपाळराव बुट्टी ह्यांना श्रीबाबा लाडाने "बुट्टीकुटी" असे म्हणत. एकदा पदसंवाहन करताना बुट्टीनी श्रीबाबांना आपण नागपूरला केव्हा येणार असे विचारले असता श्रीबाबा उत्तरले, "माझी कुटी तेथे बांध म्हणजे मी येईन. ह्या प्रसंगावरून श्रीबाबा आपल्या आश्वासनाप्रमाणे नागपूरात वास्तव्यासाठी लौकरच येणार आहेत असे मत डॉ. गव्हाणकर ह्यांनी व्यक्त केले.

समारंभाच्या शेवटी श्रीबाबांची आरती झाल्यानंतर प्रसाद वाटण्यात आला. श्रीबाबांच्या पादुका दोन दिवस धन्तोलीला कोंडूभवनात दर्शनासाठी ठेविल्या होत्या. गुरुवारी रात्री नागपूरच्या प्रमुख भागातून पादुकांची शोभायात्रा मोठ्या थाटात काढण्यात आली होती. समारंभ यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल श्रीसाई सेवामंडळाचे कार्यकर्ते अभिनंदनास पात्र आहेत.

*

# श्रीसाईलीला लेखक - कवींचे थाटात साजरे झालेले तिसरे स्नेहसंमेलन

● श्री साईलीलेच्या लेखक कवीचे तिसरे स्नेहसंमेलन शिर्डी क्षेत्री रविवार दिनांक ३० व सोमवार दि. ३१ जाने. १९७७ रोजी मोठ्या थाटाने साजरे करण्यात आले १९७५ साली अशा स्वरूपाचे पहिले संमेलन व १९७६ मध्ये दुसऱ्यांदा भरविण्यात आले होते. यंदाचा हा सुमारे शंभरावर लेखक -कवींचा मेळावा अतिशय उत्साहाने दोन-तीन, दिवस एकत्र आला आणि हा समारंभ सोहळा अत्यंत शांतपणे व यशस्वीपणे पार पडला ही आनंदाची गोष्ट आहे.

या स्नेहसंमेलनाला श्रीसाईलीलेच्या इंग्रजी-मराठी अंकातून अधून मधून व नियमितपणे लेखन करणारी स्त्री-पुरुष मंडळी हजर होती. मुंबईहून साईभक्त डॉ. के. भ. गव्हाणकर, श्री. मोहितेबाबा, सर्वश्री डी. आर. खडके, चंद्रकांत सामंत बंधु, दादासाहेब चव्हाण, श्री. व सौ. प्रकाशभाई जोशी, दशरथ तळेकर, नंदवानीजी, एस. पी. कोरगांवकर, मा. ग. गोरे, श्रीराम सातर्डेकर, वासुदेवराव सकपाळ, भाऊ कोचरेकर, वसंत खोपकर, राधाकृष्ण गुप्ता 'चेतन', ॲड. जाफरी. श्री व सौ. कलावती चव्हाण, शामराव जुवळे, नंदकुमार पिसाट, सुरेश सातपुते, ठाण्याहून श्री. व सौ. द. शं. टिपणीस, पुण्याहून प्रा. र. श्री. पुजारी, श्री. व सौ. रघुनाथ सांडभोर, मधुकर देशपांडे, श्री. व सौ. गर्ज, श्री. द. ग. मोरे, मालेगांवहून सौ. सुशिलाबाई हजारे, दुधन्याकडून श्री. रामराव पाटकर, इंदूरहून श्री. व सौ. बापूसाहेब निरखे, बिदरहून प्रा. गुंडेराव, पटवारी, नागपूरहून श्री. के. रा. धालगांवकर, पिंपरीहून श्री. डी. बी. पोतनीस, साताऱ्याहून श्री. पांडुरंग भुजबळ, नागपूरहून श्री. व सौ. मनोहरभाई शहा, व श्री. हसमुख पाटील, फणसाहून श्री. चिंतामणराव ढापरे, कसौलीहून श्री. गोयल, गुळुंचेहुन प्रा. अमिनगड,

शिर्डीच्या सौ. उषाताई गुळे, इ. इ. प्रमुख मंडळींचा अवश्य उल्लेख करावयास हवा. याशिवाय सिकंदराबाद येथील साईबाबा सेवा समाजम संस्थेचे अध्यक्ष, श्री. नायडू, श्री. राव, मुखपत्र साईलीलाचे संपादक इ. इ. उपस्थित होते. संमेलनाच्या पहिल्या दिवशी म्हणजे रविवार दि. ३० जाने. रोजी सकाळी ९-३० वा. प्रत्यक्ष कार्यक्रमास सुरुवात झाली. श्रीसाईबाबांना अनेकदा प्रत्यक्ष पाहिलेले व शिर्डीतच त्याकाळी वास्तव्य करुन असलेले व आता अहमदनगर येथे असलेले सुसंस्कृत व गीता सज्जन साईभक्त श्री. अनंत जयदेव चितांबर अध्यक्षस्थानी होते. श्री साईबाबा संस्थानचे कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठक या संपूर्ण कार्यक्रमास हजर होते. श्री. चितांबर साहेबांच्या अध्यक्षीय उपस्थितीत सकाळच्या कार्यक्रमास ९-३० वाजता सुरुवात झाली सकाळच्या पहिल्या बैठकीत वयोवृद्ध साईभक्त श्री. नारायण पुरुषोत्तम उर्फ काकासाहेब अवस्थी, दहिसरचे श्री. काकडे गुरुजी यांच्या दुःखद निधनाबद्दल शोक ठराव संमत करून दोन मिनिटे स्तब्धता पाळून त्यांना श्रद्धांजली वहाण्यात आली. नंतर श्रीसाईलीलेच्या इंग्रजी आवृत्तीचे का. संपादक डॉ. श्री. दि. परचुरे यांनी सर्वांचे स्वागत करून संमेलन भरविण्याचा उद्देश कथन केला आणि संमेलन यशस्वी करण्यास सर्वांना आवाहन केले.

यानंतर अध्यक्ष श्री. चितांबर यांचा परिचय का. संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांनी करुन दिला व त्यानंतर श्रीसाईलीलेच्या श्रीसाई काव्यबहार या खास अंकाचे प्रकाशन अध्यक्षमहोदयांचे शुभहस्ते करण्यात आले. नंतर दुरून दुरून आलेल्या मंडळींनी आपापला परिचय करुन दिला. याच्याचमध्ये ठीक अकरा वाजता राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना श्रद्धांजली वाहण्याचा कार्यक्रमही दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून पाळण्यात आला.

परिचय कार्यक्रमानंतर अध्यक्ष श्री. चितांबर यांनी अध्यक्षीय भाषण केले. आपल्या भाषणात त्यांनी संमेलनाची कल्पना उत्कृष्ट असल्याचा निर्वाळा दिला. त्यांनी बाबांच्या वेळच्या शिर्डीतील आठवणी सांगितल्या. त्यावेळची शिर्डी आणि आजची बदललेली शिर्डी त्यांनी रंजकतेने सांगितली. आपल्या वडिलांची शिस्त व धाक याचा आपल्या जीवनावर झालेला परिणाम विषद करून पूर्व पुण्याईने आम्हाला शिर्डीचे सानिध्य व बाबांचा सहवास घडून घरातील सर्वांना त्यांची सेवा करण्याची संधी लाभली हे आमचे महत भाग्य होय असे ते म्हणाले. सध्याच्या साईभक्तीचे वैभव वाढते असून संतांपुढे नम्र होणे यातच आपले सार्थक आहे. प्रत्येकाने अंतरीचा आत्माराम पहावा. आपण कुठे आहोत ते पहाणे अत्यंत आवश्यक आहे. शेवटी भागवत भक्तीचे प्रेम वाढीस लावण्याचा आदेश त्यांनी दिला, व आपले भाषण टाळ्यांच्या गजरात संपविले.

सकाळचा हा सुंदर कार्यक्रम संपल्यावर सारी मंडळी दुपारच्या आरतीस गेली. प्रसाद ग्रहणानंतर विश्रांती घेऊन दुपारी चार वाजता संमेलनातील चर्चेच्या प्रत्यक्ष कार्यक्रमास सुरुवात झाली. या बैठकीत मासिक श्रीसाईलीलेचा खप जास्तीत जास्त वाढविण्याच्या दृष्टीने काय काय करता येईल याबद्दल मोकळेपणाने चर्चा झाली. अनेक वाचकांनी लेखकांनी आपापले विचार मांडले. अनेकांनी आता मासिकात जाहिराती घ्याव्यात अशी सूचना केली. पण कार्यकारी संपादक श्री चेंदवणकर यांनी श्री साईलीलेला जाहिरातरूपी भिक्षेची मुळीमुद्रा गरज नसल्याचे स्पष्ट केल्यावर तो मुद्दा बाजूला करण्यात आला. मासिकाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी मराठी व इंग्रजी आवृत्तीप्रमाणेच सर्व भारतीय भाषांमधून आवृत्त्या प्रसिद्ध व्हाव्यात. विशेषतः गुजराती व हिंदी भाषातून तर अंक निघावेत असे बहुमताने विचार मांडले गेले. अंक व प्रकाशने यांचा प्रसार होण्यासाठी समाधी मंदिराच्या आसपास एक स्टॉलही उघडला जावा अशी स्तुत्य सूचना एका लेखकाने मांडली प्रा. र. श्री. पुजारी यांनी साईबाबांचे चरित्र वाचकांच्या डोळ्यासमोर अखंड राहील अशी काहीतरी तजवीज करावी, बाबांच्या असंख्य लीलापैकी अर्थपूर्ण लीला प्रत्येक साईलीलेत देऊन त्याद्वारे चिंतनजनक विचार बोध घडवला जावा असे सांगितले.

श्री. प्रकाशभाई दोशी यांनी संमेलने ठिकठिकाणी म्हणजे जिथे जिथे साईबाबांची मंदिरे आहेत, तिथे भरवावीत अशी सूचना मांडून ठिकठिकाणच्या वाचनालयातून बाबांचे साहित्य पुरवावे तसेच समाधि मंदिरात एक पेटी ठेवून त्यात भक्तांनी आपापले बाबा-विषयीचे अनुभव त्यात टाकावेत अशी सूचना मांडली. प्रा. गुंडेराव पटवारी, चेतन श्री. पाटील, श्री. बापूसाहेब निरखे, गर्जे, श्री. भुजबळनी साईलीलेच्या प्रसार प्रचाराच्या दृष्टीने सूचना मांडल्या 'साईलीस या इंग्रजी नियतकालिकेचे संपादक श्री. राव यांनी कानडी व तेलगूमधून श्री साईलीलेची आवृत्ती प्रकाशित करावी अशी सूचना मांडली तर श्री. जी. व्ही. आर. नायडू यांनी साईलीलेत साईलीला कुटुंब वृत्तसार याप्रकारचे एक नवे सदर सुरू करण्याविषयी सुचविले. प्रत्येक प्रांतात किंवा राज्यात प्रत्येक भाषेतील चार जबाबदार प्रतिष्ठित पुढे येऊन त्या त्या प्रांतात किंवा राज्यात मासिक प्रसिद्ध व्हावे अशी सूचना श्री. द. शं. टिपणीस यांनी केली. मासिकातून बाबांच्या लीलाप्रमाणेच इतरही सत्पुरुषांच्या लीला द्याव्यात तसेच त्यांचा गर्भितार्थ पण द्यावा असेही ते म्हणाले. साईलीलेचे मुखपृष्ठ आणखीन सुधारले जावे असेही ते पुढे म्हणाले. सायंकाळी ७ वा. हे दुसरे अधिवेशन संपले.

२१ तारखेस दुसऱ्या दिवशी सकाळी लेखक मंडळींना पूजा, श्रींवर अभिषेक इ. धार्मिक कार्ये करण्यासाठी मुद्दाम अवसर देण्यात आला. सायंकाळी चार वाजता

तिसरे अधिवेशन भरविण्यात आले व यावेळी अगदी भरगच्च कार्यक्रम झाला. या अधिवेशनात श्री. व सौ. पाठक साहेब, श्री. व सौ. सदानंद चेंदवणकर, डॉ. परचुरे, श्री. व सौ. द. शं. टिपणीस व श्री. अनंतराव चितांबर यांचे लेखक वर्गातर्फे सत्कार करण्यात आले. पुरुषमंडळींना हार श्रीफळ व बाबांच्या आकृतीचा छानदार बिल्ला व भगिनींना खण-नारळ वेणी देऊन सत्कार केला गेला. याप्रसंगी श्री. पुजारी, चंद्रकांत सामंत, डॉ. गव्हाणकर, श्री. टिपणीस, श्री. गजे, श्री. खोपकर, इ. नी संपादक मंडळातील व्यक्तींवर गौरवपर भाषणे झाली. या भाषण प्रसंगी अधून मधून प्रा. पटवारी यांची शेरो-शायरी होत होती. वरळीच्या श्रीसाई मंदिराचे संचालक व वयोवृद्ध साईभक्त श्री. मोहिते बाबा यांचा या संमेलनात श्री. पाठक साहेबांनी शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला. या सर्व कार्यक्रमास श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे नवे ऑफिस सुपरिटेंडेन्ट श्री. शंकरराव घोडखिंडी साहेब जातीने हजर होते. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार डॉ. परचुरे यांनी मानले. महिला मंडळीतर्फे सौ. सुशिलाबाई हजारे यांनी अत्यंत समर्पक शब्दात आभार मानले. आम्ही संमेलनास दोन दिवस येतो म्हणजे माहेरी येतो. पण हे दोन दिवस आम्हास पुरत नाहीत. माहेरी आल्यावर काहीतरी काम मुलींना करावेच लागते. पण इथे या माहेरी काहीही करावे लागत नाही. आयते



लेखक–कवी स्नेहसंमेलनात श्री. श्रीसाईलीला इंग्रजी आवृत्तीचे कार्यकारी संपादक डॉ. श्री. द. परचुरे सर्वांचे स्वागत करताना.

तटावर बसायला मिळते. व परत जाताना अहेरही मिळतो. असे आभार प्रदर्शन प्रसंगी सांगितले. इंदूरचे श्री. बापूसाहेब निरखे यांनी श्रीसाई बाबांच्या दुर्मिळ छायाचित्राची एक सुंदर स्टेनलेस स्टीलची फ्रेम श्री. पाठक साहेब यांना भेटी दाखल दिली, व ती त्यांनी स्वीकारली. श्री. घोडाखिंडी साहेब यांनी संस्थानतर्फे सर्व मंडळींचे आभार प्रदर्शन केले. स्नेहसंमेलनाची सांगता सुप्रसिद्ध गायक व श्रीसाईभक्त श्रीराम सातार्डेकर यांच्या भैरवीने झाली.

यंदाही संस्थानतर्फे, जमलेल्या लेखक, कवी मंडळींना डेन्मार्क बिस्कचा डबा, उदीची डबी, बाबांचे सुंदर तिरंगी चित्र व रोजनिशी भेटीदाखल दिली गेली. डॉ. गव्हाणकर यांनी श्रीबाबांच्या चरणकमलाचा फोटो सर्वांना वाटला. माटुंग्याचे उद्योगपती श्री. बाबूभाई शहा यांनी काही मंडळींना मौलिक खडे व सर्वांना बाबांची रंगीत आर्ट पेपरवर छापलेली छायाचित्रे वाटली. संस्थानच्या वाचनालयातील नव्या सेविका सौ. अंजली कोटस्थाने यांनी स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमास दोन्ही दिवस हजर राहून कार्यक्रमाचे इतिवृत्त टिपले. अशाप्रकारे श्रीसाईलीला लेखक - कवी मंडळींचा दोन दिवसांचा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम रंगला व संपला.

*

# दोन प्रश्न : विचार मंथन

**सूर्यकांत माधवराव गर्जे**
८० शिवाजी नगर पुणे ५

ता- ३१ जानेवारी १९७७ रोजी श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईलीला मासिकाचे लेखक–कवी संमेलन भरले होते. सभागृह उपस्थित श्रोतृवृंदांनी फुलून गेले होते. खेळीमेळीच्या आणि स्नेहाच्या वातावरणात सभेचे कामकाज सुरू झाले. अनेक वक्त्यांनी हजेरी लावली. आपले विचार मनमोकळेपणाने मांडले. श्रोत्यांनीहि तिला चांगला प्रतिसाद दिला. वक्त्यांपैकी ठाण्याचे वयोवृद्ध, ज्ञानी साईभक्त श्री. द. शं. टिपणीस यांनी सर्व उपस्थितांचे लक्ष आकर्षित केले. त्यांची अस्खलित ओघवती भाषा आणि श्री साई–प्रीति हृदयाला जाऊन भिडली.

श्री. द. शं. टिपणीस यांनी सभे पुढे दोन प्रश्न टाकले, विचारमंथनासाठी. मी माझ्या अल्प बुद्धीला स्मरून उत्तर शोधण्याचा प्रयत्न करीत आहे.

त्यांचा पहिला प्रश्न होता– आपल्या शंखध्वनीने सर्व गांवकऱ्यांची झोप उडविणारा रोहिला ! या रोहिल्यास श्री बाबांनी जवळ का केले होते ?

रोहिला एक फकीर होता. आडदांड बांध्याचा. आपल्या बायकोला टाळून तो रोज रात्री–अपरात्री शिर्डी गावात " अल्ला हो अकबर " चा उच्च स्वराने गजर करीत भटकत असे. बाया-बापड्यांची झोपमोड होऊ लागली. सर्व लोक वैतागले.

" ही काय रोहिल्याची पीडा ! " असे म्हणून त्यांनी त्रागा केला. श्री बाबांना सांगून रोहिल्याची हकालपट्टी करण्याचा प्रयत्न केला; परंतु श्री बाबांनी उलट रोहिल्यास जवळ केले. रोहिला अहोरात्र अल्लाचा गजर करीत असे. हरिनामाचा जयघोष करीत असे एक प्रकारे रोहिला सर्व लोकांना संदेश देत होता, " उठा, निद्रेचा-मोहाचा पाश झटका आणि हरिनामाचा जयघोष करा. मानवाचे आयुष्य मर्यादित आहे तेव्हा वेळ फुकट घालवू नका. झोपला तो संपला. पुण्य पदरात पाडून घ्यावयाची संधी लाभली तेव्हा तिचा जास्तीत जास्त लाभ घ्या. उठा आणि भगवंताचे नामस्मरण करीत बसा. यातच मानवी जीवनाचा उद्धार आहे. "

असा दिव्य संदेश देणारा रोहिला श्री बाबांना प्रिय न होईल तरच नवल ! या संदर्भात श्री साई चरित्र पान ३६ अध्याय ३ रा ओवी क्रमांक १३३/३४ पुढील प्रमाणे आहे.

निसर्गदत्त घर्घर स्वर । " अल्ला हो अकबर " नामगजर ।
कलमे पढे आनंद निर्भर । नित्य-निरंतर रोहिला ॥१३३॥
जयासी हरिनामाचा कंटाळा । बाबा भीती तयाच्या विटाळा ।
म्हणती उगा कां रोहिल्यास विटाळा । भजनी चाळा जयाते ॥१३४॥

एका कवीने डासावर अशीच उक्ति केली आहे. झोपलेल्या माणसाच्या काना भोवती डास गुणगुणत असतो, जणु डास त्याला कानात सांगत असतो, " उठ, निद्रेचा त्याग कर. देवाचे नामस्मरण करीत बस. झोपून आयुष्याचा मौलिक समय बरबाद करू नकोस. उठ, उठ अन् देवाचा धावा कर. "

श्री. द. शं. टिपणीस यांचा दुसरा प्रश्न होता- श्रीबाबांनी शामाजवळ आंबे दिले व सांगितले की, " आंबे दामू कासाराला दे आणि म्हणावे, आंबे खा आणि मरून जा " श्रीबाबांनी असे का म्हटले ?

साई भक्त श्री. दामोदरपंत रासने हे अहमदनगरचे रहिवासी. त्यांना दोन बायका होत्या, परंतु संतती नव्हती. आपणास अपत्य व्हावे म्हणून त्यांनी श्रीबाबांपाशी धरणे धरले होते. एके दिवशी मुंबईहून एका भक्ताने श्री बाबांना आंब्यांची करंडी भेट म्हणून दिली. श्रीबाबांनी काही आंबे शामा उर्फ माधवराव देशपांडे यांच्या जवळ दिले व सांगितले – दामू कासाराला आंबे दे. आंबे खा आणि मरून जा म्हणावे. या मागे श्रीबाबांचा म्हणण्याचा असा अर्थ होतो की, श्रीबाबांच्या कृपेने अपत्य होईल आणि संसारात तो अधिकच गुंतला जाईल, गुरफटला जाईल. बायका मुलांचे करता करता त्याला पुरेवाट होईल. मग भगवंताचे चिंतन करायला त्याला सवड कोठून मिळणार ? अध्यात्मिक दृष्ट्या त्याचा तो मृत्यूच नव्हे का ?

# शिरडीवृत्त माहे जानेवारी १९७७

या महिन्यात बाहेर गावच्या साईभक्तांची बरीच गर्दी होती. मुंबई, गुजरात, मध्यप्रदेश, मद्रास वगैरे ठिकाणाहून यात्रेकरूंच्या व विद्यालयीन मुलांच्या बऱ्याच सहली येऊन गेल्या. काही कलाकारानी श्रीपुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणे—

**कीर्तन :–** १) संस्थानगवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली.
२) ह. भ. प. गणपतबाबा जावळे, मराठवाडा.
३) सौ. कलावती ब. चव्हाण. दादर मुंबई याचे हरी कीर्तन झाले.

**प्रवचन :–** १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिरडी.
२) ह. भ. प. बाबू कृ. जाधव, शिरडी.

**भजन :–** १) डॉ. मोर परिया कृष्णभजन मंडळ, मुंबई २.
२) ह. भ. प- भजनी मंडळ पिळगाव गोवा.

**गायन, वादन :–** १) श्री. भोलानाथ रा समेळ मुंबई ४.
२) श्री. बाळकृष्ण गो. पंडीत, पुणे ११.
३) वग सम्राट श्री. दादू मारुती इंदूरीकर व १८ कलाकारानी करमणूक कार्यक्रम केले.
४) श्री. गोविंदराव राजस्थानी व पार्टीने कठपुतली बाहुल्याचे कार्यक्रम केले.
५) श्री. अशोक शि. भडांगे, नाशिक.
६) स्वामी रामानंद, बेळगाव.
७) श्री. अशोककुमार म. मोरे, पुणे.
८) गांधी स्कूल, सिकंदराबाद ( आंध्र ).

साईलीला कवि संमेलनातील कलाकार :—

१) सौ. कलावती ब. चव्हाण, मुंबई. २) श्री. रघुनाथ बा. सांडभोर, पुणे. ३) सौ. कमल र. सांडभोर, पुणे. ४) श्री. अप्पा सामंत, मुंबई. ५) श्री. दत्तात्रय मोरे, पुणे. ६) श्रीराम वि. सातर्डेकर, मुंबई. ७) श्री. हसमुख ओ. पाटील, नवापूर. ८) श्री. केशव रा. ढालगांवकर, नागपूर.

**स्वराज्य दिन :–** २६ जानेवारी १९७७ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रतिवर्षा प्रमाणे मा. श्री. का. सी. पाठक कोर्ट रिसीव्हर यांचे शुभ हस्ते श्रीसांईबाबा मंदिरावरील कळसा जवळ ध्वजवंदन कार्यक्रम झाला.

सर्व संस्थान कर्मचारी, सेवक वर्ग, सन्माननीय पाहुणे, होमगार्ड-पथक, पोलीस, साईनाथ माध्यमिक विद्यालयातील शिक्षक वर्ग, विद्यार्थी–विद्यार्थिनीं, बॅण्ड पथकासह उपस्थित असल्याने कार्यक्रम थाटात साजरा झाला. संस्थेतर्फे मुलांना खाऊ वाटण्यात आला.

माननीयांच्या भेटी :—

१) मा. श्री. रत्नाप्पाकुंभार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री महाराष्ट्र राज्य.
२) मा. डी. पी. देसाई, मुख्य न्यायाधिश उच्च न्यायालय गुजराथ.
३) मा. श्री. एन. के. पारेख, जज्ज सिटी सिव्हिल कोर्ट मुंबई.
४) मा. श्री. एम. आर. पाटील, LAS जिल्हाधिकारी धुळे.
५) मा. श्री. डी. डी. साठे, ICS निवृत्त मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य.
६) मा. श्री. जे. आर. मुधोळकर, निवृत्त न्यायाधिश; उच्च न्यायालय, नवी दिल्ली.

**हवापाणी** :— शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.


## श्री साईलीला
## खास रामनवमी विशेषांक

**२८ मार्च १९७७ रोजी थाटात प्रसिद्ध होणार**

- शिर्डीच्या चावडी मंदिरातील स्वामी श्री शिवनेस बाबा यांचा परिचय
- प्रभाते मनी राम चिंतीत जावा – सदानंद चेंदवणकर
- सुत दशरथाचा रामु – डॉ. के. भ. गव्हाणकर
- कवि रहीम – श्री. विनायक पाठक
- मानव उन्नतीचे सोपान – रामायण – डॉ. अनिल जायस्वाल
- प्रभु रामचंद्राची कुंडली – रंजक लेख – होरालंकार शं. बा. देवधर
- श्रीसाई रामाची रामकथा - श्री. चकोर आजगांवकर एम. ए.
- प्रभु रामचंद्राना राज्याभिषेक दिवाळीच्या दिवशी झाला ! माहितीपूर्ण लेख

याशिवाय अनेक कवी कवियत्रींच्या भावरम्य कविता

पृष्टे ४८ किंमत अवघी साठ पैसे

# श्रीसाईबाबाच्या पादुकांचे मुंबईकरांना दर्शन




श्रीसाईच्या मूर्ती समोर श्रींच्या पादुका दिसत आहेत

श्री क्षेत्र शिर्डी येथील श्रीसंत साईबाबांच्या परमपूज्य अशा पादुकांचे दुर्मीळ असे खुले दर्शन वरळी येथील श्रीसाई भक्त श्री. मोहिते बाबा यांच्या साईनाथ मंदिरात हजारो भाविकांना व श्रीसाई भक्तांना दि. १५-१६ व १७ फेब्रुवारी १९७७ रोजी लाभले व त्यामुळे त्यांना धन्यता वाटली असे त्यांनी बोलूनही दाखविले.

या पादुकांची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून रितसर परवानगी काढून शिर्डीहून या पादुका मंगळवार दि. १५-२-७७ रोजी सायंकाळी ५ वा. दादरला 'साई निकेतन' येथे आल्या व वरळी दूरदर्शन केंद्राजवळून त्यांची सायंकाळी ५-३० चे सुमारास मोठ्या थाटाने पालखीतून मिरवणूक काढण्यात आली व सायं. ७ चे सुमारास त्या पादुका श्री. मोहिते बावांच्या जांबोरी मैदानातील मंदिरात नेण्यात आल्या. तिथे प्रथम सुवासिनी कडून त्यांची ओवाळणी केली गेली.


बुधवार दि. १६ रोजी महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळी ५ वा. काकड आरती व पादुकांची षोडशोपचारे पूजा करण्यात आली. व त्यानंतर पादुकावर एक लाख बिल्व पत्रे वाहण्यात आली त्यानंतर संत दासगणू कृत चार अध्यायांचे २१ मंडळीकडून पारायण करण्यात आले. दुपारच्या आरतीनंतर सायंकाळी ६ वाजेपर्यंत स्थानिक कलाकारांचे कार्यक्रम व सूर्यास्तानंतरच्या आरतीनंतर रात्री ८ वा. साईभक्त डॉ. के. भ. गव्हाणकर यांचे प्रवचन, श्री. गोपाळराव सुर्वे यांचे गायन, श्री. आप्पा सामंत यांचे ढोलकी वादन, श्री. एकनाथ धनवडे, लाड व विनायक पार्टी व शाहिर सुखदेव कांबळी व पार्टी यांचे कार्यक्रम झाले.

गुरुवार दि. १७-२-७७ रोजी दुपारच्या आरतीनंतर ठाण्याचे वीणा भजन मंडळीचा सुंदर कार्यक्रम झाला. व त्यानंतर श्री. गजानन महाराज पट्टेकर; श्री. मोहिते बाबा, श्री. व सौ. पारेख साहेब, डॉ. व सौ. गव्हाणकर, श्री. मार्तंड भगत यांचा सत्कार करण्यात आला. सायंकाळचे आरतीनंतर श्री. जयवंत कुलकर्णी यांचा सुश्राव्य गायनाचा बहारदार कार्यक्रम झाला. रात्रीच्या शेजारतीनंतर दोन दिवसाचा संपूर्ण कार्यक्रम संपला.

शुक्रवारी सकाळी ८ ते १२-३० वाजेतो पर्यंत पादुका संस्थानच्या दादरच्या कार्यालयात दर्शनास ठेवण्यात आल्या व त्यानंतर त्या शिर्डीस गेल्या.

दोन दिवसाच्या संपूर्ण कार्यक्रमास मंदिर व सभामंडप सुशोभित करून नेत्रदिपक रोषणाई केलेली होती. श्री. मोहिते बाबांच्या मंदिरातील सर्व कार्यकर्त्यांनी उत्तम व्यवस्था राखली होती सर्व कार्यक्रम ठरल्या वेळेप्रमाणे यशस्वी झाले. दोन्ही दिवस भाविकांची व श्रीसाई भक्तांची अतोनात गर्दी मंदिराकडे झाली होती. अध्यक्ष डॉ. गंगाधर पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.

❁



श्रीसाई मंदीरात मूर्ती शेजारी श्री. चंद्रकांत सामंत, श्री. मोहिते बाबा श्री. पिसाट हे दिसत आहेत.

# लेखक-कवी संमेलनातील क्षण चित्रे

● संमेलनाची सुरवात श्री साईंच्या संदेशाने झाली. गाद्यांची बैठक होती. अध्यक्ष, श्री. पाठक साहेब व त्यांच्या सोबतीला एक दोन श्रेष्ठ व्यक्ति यांच्यासाठी खुर्च्या व टेबल अशी व्यवस्था होती. पाठक साहेब आल्याबरोबर त्यांनी खुर्च्या काढावयास लावल्या व त्या ऐवजी गादीची बैठक घालण्यात आली. आपण सर्व समान आहोत. वरिष्ठ कनिष्ठ असा भेद येथे नाही. ही या मागील पाठक साहेबांची भावना कौतुकास्पद आहे. अशा प्रकारे त्यांच्या कृतीने बाबांनी 'समतेचा संदेश' आपल्या सर्व लेखकूंना दिला.

● चर्चा पुष्कळ झाली. पण सूचनांचा सुकाळ व जबाबदारीचा दुकाळ असं अधिक होतं.

● साईलीला निरनिराळ्या भाषेत असावी याबद्दल पुष्कळ चर्चा झाली. त्याच त्याच सूचना करून बरेच वक्ते भाषेच्या चक्रातच फिरत राहिले. यामुळे बराच वेळ वाया गेला.

● हे संमेलन म्हणजे अनुभव संमेलन आहे असा समज झाल्यामुळे काही आपले अनुभव सांगत राहिले. हे साहजिक असले तरी सभेची शिस्त, वेळ व विषय यांची बंधने पाळणे जरूर आहे.

● सुमारे दहाएक तास झालेल्या या संमेलनाची फलश्रुति म्हणजे भाषेबद्दल व कव्हराबद्दल विचार ही होय. साईलीलेच्या अंतर्गताबद्दल व ६० व्या वर्षाच्या कार्यक्रमाबद्दल काहीच विचार झाला नाही. वाटणीला येणारा वेळ लक्षात घेऊन मुद्देसूद बोलणे अशा संमेलनात आवश्यक असते.

● चहाच्या वा भोजनाच्या वेळी जे चेहरे दिसत, त्यापैकी काही चेहरे संमेलनात दिसत नसत.

● तुम्ही हे बोला, असं सुचवा, असं काही आम्हास सांगत होते. :परभारे पावणेतेरा.

* असे ऐकतो :की एक भगिनी संमेलन चालू असता चहासाठी भोजनगृहात गेली असता तिला चहा मिळाला नाही. संमेलनात चहाची व्यवस्था केली आहे. इथं चहा न देण्याची आम्हास आज्ञा आहे असं नम्रपणे सांगूनही तिचे समाधान झाले नाही, ती रागावली, रुसली, फुगली व स्वतः तिकीट काढून गरमागरम चहा पिऊन थंड झाली.

● एका भगिनीने शिर्डी हे आमचे माहेर असा उल्लेख केला. त्यातला गोडवा

सर्वांच्या हृदयाला भिडला. खरंच किती गोड कल्पना. जया काय पंधरा शुभ्र तिळगूळ.

● परिणामी चार दिवस माघेरी राहण्यास मिळावे अशी मागणी माहेरवाशिणींकडून झाली हे निराळे.

● संमेलनाची सांगता पुन्हा बाबांच्या संदेशाने झाली. श्री. पाठक साहेब हे एका मोठ्या संस्थानचे उच्च पदस्थ, जुन्या भाषेत म्हणावयाचे तर संस्थानिक आहेत. त्यांचा प्रथम सत्कार होणं उचित होतं. पण पाठक साहेबांचा विनय, नम्रता व औदार्य असे की त्यांनी प्रथम इतरांचा सत्कार करावयास लावला व मग आपला करवून घेतला. 'आधी घास दुसऱ्याला मग आपल्याला' या प्रमाणेच, पाठक साहेबांना निमित्य करून 'आधी मान दुसऱ्याचा मग आपला' हा संदेश देऊन बाबांनी संमेलनाची सांगता केली.

● एकंदरीत संमेलन यशस्वी झाले. संमेलनाची मूळ प्रेरणा कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांची. साहजिकच रितिरिवाजाप्रमाणे सर्व जबाबदारी (कष्ट करण्याची) त्यांच्यावरच. ती त्यांनी श्री. पाठक साहेब, डॉ. परचुरे व अन्य मंडळी यांच्या साहाय्याने पूर्णपणे पार पाडली याबद्दल वरील सर्व मंडळींना लेखक व कवि यांनी धन्यवाद दिले. कोणी हिमतीने पुढे जाऊ लागला की बाकीच्यांना हिम्मत येऊन ते सहकार्य करतात. पण पहिला खरा हा हिम्मत बहाद्दर. संमेलन चार दिवस असावे या मागणीतच संमेलनाची यशस्वीता दिसून येते.

● श्री साईबाबांच्या आशिर्वादाने व साहाय्याने संमेलन यशस्वी झाले. त्याबद्दल बाबांना शतशः प्रणाम.

— द. शं. टिपणीस

# परीक्षा आणि श्रीसाईबाबा

● गेली चार वर्षे बी. ए. ला काही ना काही अडचणी आल्यामुळे बसू शकलो नाही. या वर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या परीक्षेस बसण्याचे ठरवले, व फॉर्मस भरले. परंतु घरगुती अडचणींमुळे मला माझी किरकोळ रजा संपूर्ण अगोदरच संपवावी लागली. शिवाय हक्काच्या रजेतून २० दिवस रजा घ्यावी लागली. अशाहि परिस्थितीत परिक्षेला बसण्याचे ठरवले, व माझ्या साहेबांना दि. ७-१०-७६ रोजी रजेचा अर्ज करण्यापूर्वी समक्ष भेटून त्यांना विनंती केली. त्यांनी सरळ पुढच्या वर्षी परीक्षेला बस, असे सांगितले. पुढचे सर्वच मार्ग खुंटले. तशाच अवस्थेत श्रीसाईबाबांची मनःपूर्वक

प्रार्थना ऑफिसच्या खुर्चीत बसून केली, व अर्ज लीव्हसेक्शनमध्ये पाठवून दिला. दोन दिवसानी बॉम्बे पोर्ट ट्रस्टचे (आमचे) चेअरमन पाहणीसाठी आले. त्यांनी व खात्याच्या प्रमुखांनी माझ्या कामाची श्रीसाईकृपेने वाखाणणी केली, व त्याच दिवशी त्यांनी केवळ दोन दिवसापूर्वी रजा देणार नाही असे निक्षून सांगितले, त्यांनीच ती रजा लगेच मंजूर केली. असे अनेक प्रसंग प्रस्तुत लेखकाच्या जीवनात श्री साईबाबांनी घडवलेत. त्यांच्या सामर्थ्यास पारावार नाही.

**श्री. अनिल केशवराव रसाळ,**
२१/३८२, बी. पी. टी. स्टाफ क्वार्टर्स,
रेनॉल्डस रोड, वडाळा (पूर्व),
मुंबई ४०० ०३९.

# वाचकांचा पत्रव्यवहार....

श्री. संपादक साईलीला यांस.

स. न. वि. वि.

श्री साईबाबांच्या जीवन चरित्राविषयीची अनेक लेखकांची अनेक पुस्तके वाचूनही जी माहिती मिळू शकली नाही, ती माहिती प्राचार्य कर्नाटक हायस्कूल, पुणे यांनी लिहिलेला साईलीलेतील श्रीसाईबाबांच्या पूर्ववृत्ता संबंधीचा माहितीपूर्ण लेख "श्री साईनाथ महाराज" या लेखातून मिळू शकली.

श्री साईनाथ महाराजांची तपोभूमी, मंत्रसिद्धी, कूळ, निश्चित जन्मस्थळ, जन्मतारीख व जन्मवेळ, तसेच श्री साईंचे पहिले गुरू श्री. वेंकटेश व ज्यांच्याकडून पराशक्ति मंत्र घेतला ते गुरुवर्य श्री. रामचंद्र बाबाजी, या व अशा अनेक प्रकारच्या गोष्टीसंबंधी अपरिचित व अज्ञानी असलेल्या आम्हा वाचकांच्या ज्ञानात बरीच भर पडल्या सारखी वाटत आहे.

**श्री व श्रीमती डुबल**
२/३३५/४०६६, विक्रोळी, मुंबई नं. ८३.

श्री संपादक, साईलीला मासिक स. न. वि. वि.

फेब्रुवारी १९७७ चा श्रीसाईलीला मासिकाचा "श्री साई काव्य बहार विशेषांक" वाचला. आपल्या या स्तुत्य अन् नावीन्यपूर्ण उपक्रमाबद्दल हार्दिक अभिनंदन ! श्रीसाईनाथ महाराजांच्या कंठात घातलेली ही काव्यसुमनांची सुंदर माला मनमोहक झाली आहे. प्रत्येक कविता अर्थपूर्ण असून मनाचा ठाव घेणारी आहे. सर्व काव्यातून भक्तीरसाचा अमृत वर्षाव होत असून त्यात मन न्हाऊन निघते. कवितांचा दर्जा उच्च असून त्यास सुकोमल भावस्पर्श आहे. श्रीसाई-प्रीतीचा सुगंध आहे. मृदु मनाने केलेली श्री बाबांची आराधना आहे.

आता पर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व श्रीसाईलीला मासिकांचा हा काव्यबहार विशेषांक मुगुटमणी म्हणून शोभून दिसतो.

आपले आणि सर्व कवी-कवयित्रींचे मनःपूर्वक अभिनंदन.

आपले स्नेहांकित,

**सु. मा. गर्जे**
**– सौ. सरला सु. गर्जे**
८० शिवाजी नगर, पुणे ५

प्रिय श्री. सदानंदजी चेंदवणकर यांसी—

प्रेमपूर्वक नमस्कार,

श्रीसाईलीलेच्या श्रीसाई काव्यबहार विशेषांकासंबंधी आपले खास अभिनंदन करण्यासाठी प्रस्तुतचे पत्र लिहित आहे. अंकाचे मुखपृष्ठ, छपाई, मांडणी, आतील आपण लिहिलेला परिचय-लेख आणि समाविष्ट करण्यात आलेली विविध काव्य रचना ध्यानी घेता हा अंक दिवाळी अंकासही मागे सारणारा झाला आहे. मुखपृष्ठावरील श्री दत्तात्रेयांचे चित्र लेंडीबागेतील दत्ताचे असल्यामुळे तर बहारच झाली आहे. मूर्तीच्या मुखावरील बालसदृश निरागस भाव अंतःकरणात दर्शनाबरोबरच आनंदोर्मी निर्माण करून जातात. मूर्तीच्या दर्शनाचा ठसा मनावर इतका उमटतो की लेंडीबाग दत्तदर्शन घेतल्याविना शिरडीयात्रा कोणीही पुरी करू शकणार नाही. असो. अंकाची छपाई इतकी देखणी झाली आहे की प्रथम श्रेणीच्या मराठी मासिकात तिचा क्रमांक पहिला किंवा दुसरा लागावा. छपाईचा हा देखणेपणा पाहून माझे लेखन या अंकात छापून आले असते तर किती बहार झाली असती असा एक गमतीचा विचार माझ्याही मनात अनेकांप्रमाणे येऊन गेला. इतकेच नव्हे तर आपला इतका सुंदर अंक कोणास फारसा हाताळावयासही देऊ नये असा एक स्वार्थी विचारही माझ्या मनात क्षणभर येऊन गेला. आतील काव्याचा दर्जा उत्कृष्ट तर आहेच; पण साईभक्त नसलेल्या सात्त्विक

प्रकृतीच्या रसिकांना साईभक्त बनविणाराही आहे. या अंकाच्या दर्शनाने, वाचनाने कोणाही श्रद्धावंतास अपार संतोषच वाटेल एवढे सामर्थ्य त्याच्यात आहे. मी आपले पुनःपुन्हा अभिनंदन करतो आणि अशीच सुंदर सेवा श्रीचरणी नित्य रुजू करावी अशी विनंती करतो.

:स्नेहांकित,

—र. श्री. पुजारी, पुणे.

**संपादक, श्री साईलीला यांना,**

स. न. वि. वि.

मी आपल्या "साईलीला" मासिकाचा सभासद फेब्रुवारी महिन्यातच झालो आणि आपला "श्री साई काव्यबहार विशेषांक" वाचायला मिळाला. काव्यबहार अंक वाचल्यानंतर बौद्धिक शांति मिळाली. असा अंक प्रसिद्ध केल्याबद्दल आपणास धन्यवाद.

विशेष या अंकात पुष्कळ कवि–कवयित्रींनी आपल्या काव्यातून श्री साईबाबांचे प्रत्यक्ष दर्शन घडविल्याबद्दल त्या सर्वांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. तेव्हा असाच काव्य आणि गीतांनी सजविलेला अंक दरवर्षी प्रसिद्ध करून श्रीसाईलीला मासिकाच्या वाचकांना काव्याचा अहेर दिल्यास सर्व वाचक आपणास धन्यवाद देतील.

विनित,

**रमेश पंडित,**

सोनबा निवास, हिरा विद्यालयाजवळ,

मु. पो.–विरार, ता.–वसई, जिल्हा–ठाणे.

कार्यकारी संपादक, श्री साईलीला, मुंबई.

सप्रेम नमस्कार, वि. वि., मी श्री साईलीलेचा फेब्रुवारीचा अंक 'श्री साईकाव्य-बहार विशेषांक' सर्व वाचून पाहिला. 'श्री साई काव्यबहार' हे नाव गोड आणि सयुक्तिक आहे व ते कवि आणि कवयित्रींना आवडेल याबद्दल मला बिलकुल शंका वाटत नाही. हा विशेषांक मला फारच आवडला कारण तो फारच भावनायुक्त व भक्तिने ओतप्रोत भरलेला आहे.

तुम्ही पंचावन्न वर्षात प्रथमच काव्यांनी बहरलेला अंक प्रसिद्ध केल्यामुळे या अंकाला एक आगळेच सौंदर्य आणि नाविन्यपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे. हा अंक म्हणजे कवि आणि कवयित्रींना उत्तेजन देणारा व संग्रही ठेवण्यालायक असा आहे असे मला वाटते. सुंदर भक्ति-गीतांचा १०० पानी अंक प्रकाशित करून तुम्ही मराठी मासिक-सृष्टीत एक नवीन उपक्रम सुरू कराल, अशी माझी खात्री आहे. या नवीन प्रयत्ना-बद्दल धन्यवाद.

आपला,

**रमाकांत नागेश पंडित**

प्रभा-स्मृति, ब्लॉक नं. ७ भाऊ दाजी रोड,

माटुंगा, मुंबई ४०० ०१९

# ★ घोषणा ★

श्री साईलीला मासिकाच्या: मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दर वर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा.

| | |
|---|---|
| १. प्रकाशनाचे स्थळ– | साई निकेतन<br>८०४–बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई ४०० ०१४ |
| २. प्रकाशनाचा कालावधी – | मासिक |
| ३. मुद्रकाचे नाव – | श्री. पांडुरंग दाजिबा मोरे |
| राष्ट्रीयत्व | भारतीय |
| पत्ता – | बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, वडाळा,<br>मुंबई ४०००३१ |
| ४. प्रकाशकाचे नाव– | श्री. काशिनाथ सीताराम पाठक |
| राष्ट्रीयत्व – | भारतीय |
| पत्ता – | साई निकेतन<br>८०४–बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर.<br>मुंबई ४०००१४ |
| ५. संपादकाचे नाव – | श्री. काशिनाथ सीताराम पाठक |
| राष्ट्रीयत्व – | भारतीय |
| पत्ता – | साई निकेतन,<br>८०४–बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई ४०० ०१४ |
| ६. हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते. | श्री साईबाबा संस्थान, शिरडी<br>(धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, श्री. काशिनाथ सीताराम पाठक यानुसार असे घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

का. सी. पाठक

(प्रकाशकाची सही)

रिसीव्हर

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी

मार्च १९७७

# काव्याक्षदा

(चाल – जयजय साईनाथ आता पहुडावे मंदिरी हो । )

[श्री साईलीला तृतीय लेखक – कवी स्नेहसंमेलनाचे निमित्ताने स्फुरलेली कविता]

जय जय साईनाथ आता द्या आशीर्वचा अर्पूनि हो ॥
जमली होती सान-थोर सारी तव गुण गाणारी हो ।
रंजविले जयांनि मधुरभाषणे तयांचे कौतुक किती वर्णूं हो ।
आणिलेस तयांना तूच खेचुनि निज निज व्यापातूनि हो ।
धावूनी आले सत्वर लुटण्या तव दर्शनानंद हो ।
झाले असतील प्रमाद काही तरी घाला तव पोटी हो ।
जय जय साईनाथ आता द्या आशीर्वचा अर्पूनि हो ॥
दया क्षमा शांति हेच असे या शिर्डीचे वैभव हो ।
पाठकजींची कार्यकुशलता असे तयाला पूरक पूरी हो ।
भाषणरूपी पंचारतीने ओवाळिले सुशीला सुवासिनीने हो ।
थोडी-बहु करण्याची सेवा संधि मिळाली तवकृपेने हो ।
जय जय साईनाथ आता द्या आशीर्वचा अर्पूनि हो ॥
सोडुनि जाया दुःख वाटले साई तव भक्तांसि हो ।
प्रगति व्हावी 'साईलीलेची' असे एकचि आस मनी हो ।
सत्वर आता पुनः घडो हा सोहळा फेडी जो नेत्र पारणे हो ।
प्रार्थू तुजला निजहितास्तव पुनः मनोमनी दृढश्रद्धेने हो ।
जय जय साईनाथ आता द्या आशीर्वचा अर्पूनि हो ॥

**सौ. अंजली अ. कौटस्थाने**
श्रीसाईनाथ वाचनालय,
शिर्डी.

## साईप्रेमे ओलावती लोचन—

धन्य धन्य हो साई
कसा होऊं उतराई ?
भक्त असती अनाथ
मार्ग दाविती साईनाथ
साई व्यापिती आकाश
देती सर्वांना प्रकाश
दुष्ट सुष्ट असो कुणी
सर्वांसाठी कल्याणवाणी
साई प्रेमाचा सागर
साऱ्या भक्तांचा आधार
कैसे फिटावे साईचे ऋण
साईप्रेमें ओलावती लोचन!

— उज्ज्वल वामनराव कुळकर्णी, बी. एससी. बी. एड.
८९६/१ तांबोळी गल्ली, नंदुरबार, जि. धुळे.

## श्रीसाई महिमा

शिरडीत झाले नाथ। भक्तांना देती भेट।
हिंदू, मुस्लिम, सीख, इसाई। सर्वांना देती दर्शन ॥ ५० ॥
सर्व येती शिरडीत लोक। झाले पवित्र कसे।
शिरडी झाली पवित्र कशी। साईच्या नामाने
आला जेथे काळ। तेथे धावे नाथ ॥ १ ॥
रोग बरे झाले कसे। साईच्या कृपेने।
लोक केवळ दर्शनी येती। द्वेष विसरती लवकर।
झाले कितीक धनिक। साईच्या कृपेने ॥ २ ॥
नाम साईनाथाचे घेता। जे मागे ते मिळे।
साई अवतार ईश्वराचे। झाले साक्षात शिरडीस।
नाथांचा मी दास। कृपा करावी नाथ ॥ ३ ॥

—हसमुख ओंकार पाटील
गुजर गल्ली, नवापूर, धुळे

# मागणे

रात्रदिन वाट
भक्तांची पहात
बैसला निवांत–कृपासिंधु

शिरडीचा राणा
दीनांचा कैवारी
संकट निवारी–दुःखितांचे

विशाल मनाचा
दयेचा सागर
पाडतो विसर–संसाराचा

आतुरला जीव
भेट देई अता
भोग हे भोगता–शिणलो मी

मागणे एवढे
पायाशी निवारा
नको हा पसारा–पुढे तरी

खूप झाली वारी
थकले माझे हे पाय
सांगावा उपाय–विसाव्याचा

—दे. शि. दुधलकर
द्वारा बी. एस. हटवार
प्लॉट नं. १८६ गणेश नगर, नागपूर

## सुमंगल होते शिर्डीस्थानी—

महाराष्ट्रामधी
नगर जिल्ह्यात
ग्राम ते प्रख्यात
शिर्डी एक ॥ १ ॥

अवतारी कथा
साधासुधा संत
महती अनंत—
साई थोर ॥ २ ॥

दिशादिशातून
भक्त जन येती
भक्ती भावे अती
शिर्डी क्षेत्री ॥ ३ ॥

शिर्डीचे ते संत
पतित पावन
झाले श्रद्धास्थान—
साईनाथ ॥ ४ ॥

माता पिता गुरु
सखा सोयराही
मनी जे ते होई—
साईकृपे ॥ ५ ॥

धर्म जाती ऐक्य
सानंद नांदते
सुमंगल होते—
शिर्डीस्थानी ॥ ६ ॥

प्र. द. पुराणिक, एम. ए. एम. एड.
देशमुखवाडा, कृष्णनगर, धुळे

# साई दयानिधान

साई तुम हो दयानिधान
प्रिय भक्तों के हो भगवान ॥ टेक ॥

अगाध महिमा, अगाध कीर्ति
पावन नगरी, पावन शिर्डी
शोभा अनुपम, मन को हरती
तीर्थक्षेत्र वरदान ॥ १ ॥

श्यामल मूर्ति कुंज बिहारी
फकीर वेश में लीला न्यारी
योगीजनों की मति है हारी
तव चैतन्य महान ॥ २ ॥

माया की यह काल कोठरी
मनपंछी की नित्य हाजरी
प्राणों की जो करें चाकरी
साईं ! प्राण निधान ॥ ३ ॥

महिमा निशिदिन जो भी गावें
जीवन में वह शांति पावें
तव समाधि के दर्शन लेवें
शिरडी सुखकी खान ॥ ४ ॥

राधाकृष्ण गुप्ता 'चेतन'
पाटकरवाडा, भगतसिंग रोड,
डोंबिवली (पूर्व), ठाणे.

# श्री साई प्रभू आधार

रुक्ष अशा जीवनांत,
प्रपंच्याच्या भोवऱ्यांत
प्रेमपाशांच्या जाळ्यांत,
मी गुरफटून गेलो होतो;

ठेचाळत होतो मी अडखळत होतो,
आपटत होतो मी खरचटत होतो,
सुखदुःखाच्या प्रखर उन्हानें करपलो होतो,
तरीही मार्ग शोधित होतो,

आशेचा किरण दिसत नव्हता म्हणून,
दोलायमान मी झालो होतो,
आणि...
अशाच एका संकट समयी,
कळवळूनी आळविता श्रीसाई,

अंधुकसा कवडसा सापडला
जीवनाचा सूर गवसला,

शरण जाता साईचरणाला,
श्रीसाईप्रभुंचा दृष्टांत झाला,
करीतां दंडवत समाधिला
लाभली सुखशांती मनाला,

केली प्रार्थना बाबांपाशीं,
चरणीं ठाव द्या अरविंदाशीं

**अरविंद रा. करमरकर**
८२ बद्रिकाश्रम १ ला माळा
१ ली खेतवाडी लेन, गिरगाव, मुम्बई ४

# श्री साई तुझ्या मन्दिरात

साई तुझ्या मंन्दिरात,
अर्जुनानी पाहिलेल्या, विश्वरूप पाहिलो !
आनन्द झाला, स्वर्गांची कल्पना आली,
वय विसरलो, जात विसरलो,
साई तुझ्या दारांत,
समताचा अनुभव आला,
दुष्ट बुद्धिचा नाश झाला,
शिष्टाचार शिकलेले लहान थोर समपातळीवर होते
मन, साईं बोलू लागले ।
आरतीच्या स्वरांत जादू होती,
वात्सल्याची भर,
भक्तांच्या ध्वनि जालात माझे चित्त रमले !
साऱ्या विश्वाची एक रुपता तुझ्या चरणांत आहे !
मी भाग्यवान, दर्शन झाले !
साई कृपा अवलोकनाने,
धन्य झालो, चोर मनाची वृत्ती पालटत होती !
" पापी उद्योग करणार नाही" मन म्हणत होते !
तुझ्या चरणाजवळच साई,
मला मनुष्यत्व, देवत्व आणि ममत्व भेटले !

प्रा. गुण्डेराव पटवारी साहित्यरत्न
एन. एफ. जे. कॉलेज, बिदर (कर्नाटक)

# साईनाथा त्रिताप हरता

हे शिरडीचे साईबाबा
मम आशिर्वाद देई आता
तुझ्या कृपेने उभा ठाकलो
दुनियेच्या सभा मंडपा ॥

साईनाथा विघ्नहर्ता
बुद्धीसिद्धी तू देई आता
अनंत कोटी जगन्नायका
तूच माझा साई सखा ॥

बहूत विनये नमीतो तुजला
तूच माझा तारण कर्ता
ठायी ठायी तारण करशील
मी विघ्नांत अडकता ॥

साईनाथ त्रिताप हरता
–दुर्बलांचा पालन करता
सर्व संकटी प्रकट होई
तू कनवाळू पिता ॥

— जयवंत ना. आंब्रेरकर
'सरस्वती सदन' गणेश नगर,
भांडुप, मुंबई ७८

# साई मनोहर माझे दैवत

(चाल : दत्त दिगंबर माझे दैवत)

साई मनोहर, माझे दैवत । पूजनीय ते मला सदोदित ॥ ध्रु ॥ ,
भक्तपरीक्षा असे आगळी ।
प्रत्येकास्तव नित्य निराळी ।
पसंत पडता विभूती भाळी ।
लाविती हस्ते, साई महंत ॥ १ ॥

ज्यांसी मानिले सदा आपुले ।
अंतर त्यांसी ना कधि दिधले ॥
भक्त संकटे, 'स्वये' सोशिले ।
पतितोद्धारक, हे साई संत ॥ २ ॥

साई वदता व्यथा नासते ।
साई वंदता दैव फुलते ॥
शरणार्थींसी सर्वही मिळते ।
लीला असते त्यांची अनंत ॥ ३ ॥

विसरे माता, पिताही विसरे ।
विसरे कांता, सुतादि विसरे ॥
साई कदापि नच तुज विसरे ।
सोडू नको पद जे यशवंत ॥ ४ ॥

—मधुकर भी. देशपांडे
२३, कसबा पेठ,
पुणे ११.

॥ श्रीसाईबाबा प्रसन्न ॥



# श्रीसाईभक्तांना सुवर्ण संधी !

**कोणताही धंदेवाईक उद्देश न ठेवता** आम्ही खास साईभक्तांसाठी शिर्डीच्या साईबाबांची शिलाखंडावरील मूर्ति रोजच्या पूजेसाठी व अभिषेकांसाठी बनविली आहे.

मूर्ति पंचधातूची ( सोने चांदी मिश्रित ) असून अत्यंत मजबुत व टिकाऊ आहे. वजन २ ते २॥ किलो, उंची ९ इंच × ५ इंच रुंद आहे, तसेच मूर्तीच्या अंगावर रंगीबेरंगी कपडे या अलंकार घालून व डोईस शिरपेंच अथवा फेटा बांधून मूर्ति अत्यंत शोभिवंत करता येते.

मूर्तीची मुंबईत किंमत रु. ४०१/– रुपये चारशे एक. बाहेरगावी पोस्टेज पॅकींग इन्शुरन्स रु. ५०/– रुपये पन्नास फक्त. मूर्तीच्या स्थापनेसाठी सुबक लांकडी देव्हारे, किंमत रु. १५० ते २००.

**खास लोकाग्रहास्तव** — बाबांची द्वारकामाईतील लोकप्रिय ध्यानस्थ मूर्ति पण बनविली आहे ! किंमत रु. ५०१/– रुपये पाचशे एक फक्त.

द्वारकामाईची ( मशिदमाईची ) अस्सल लाकडी प्रतिकृती, किंमत रु. ३०१/– रुपये तीनशे एक.

**आर्डर आगाऊ नोंदवा** — अधिक माहितीसाठी भेटा अगर लिहा :—

**श्री. मनोहर घनःशाम पितळे,** ( बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर )
पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई ४०,००५७
फोन नंबर : ५७ ६२ ९८.

**भेटण्याची वेळ** — सकाळी ७ ते ९ संध्याकाळी ७ ते ९.

Regd. No. MH/BYE/26


# साईबाबा धर्मार्थ दवाखाना

(होमिओपाथिक)

## सर्व धर्मियांकरिता खुले

कृपया या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

वेळ : रोज सकाळी ११ ते १, सायंकाळी ४–३० ते ६–३०

रविवार व काही विशिष्ट सुट्टीचे दिवस सोडून

आकार : दर दिवसास २५ पैसे

नवीन पेशंटसाठी ५० पैसे नोंदणी फी आकारली जाईल.

स्त्रियांसाठी खास स्त्री डॉक्टरांची सोय

## साईबाबा धर्मार्थ दवाखाना

(शामदासानी फौंडेशन)

नवजीवन हौसिंग सोसायटी,
ब्लॉक नं. ३, रुम १०४,
लॅमिंग्टन रोड, मुंबई ४००००८


मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि., ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई–३१. संपादक व प्रकाशक : श्री. का. सी. पाठक, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.